१८२२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय ...
...नं. ...
विषय ...
सं. नं. ...

# ...पले भाऊबंद

अथवा

# जगाची ओळख.



REFBK-0002189
REFBK-0002189

लेखकः—रामचंद्र जनार्दन गोखले,

किंमत ६ आणे.

स्थळप्रत

# आपले भाऊबंद

अथवा

# जगाची ओळख.

लेखक

**रामचंद्र जनार्दन गोखले, बी. ए.,**
शिक्षक, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें.

REFBK-0002189
REFBK-0002189
२१८९

मालक, रा ... ी, बुधवार, पुणें.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर,
'जगद्धितेच्छु प्रेस,' ५०७ शनवार पेठ, पुणें.

सन १९२२.

किंमत ६ आणे.

दा. क्र. २१८९
२९८९
पु. १२

# आपले भाऊबंद

अथवा

# जगाची ओळख.

लेखक

**रामचंद्र जनार्दन गोखले, बी. ए.,**
शिक्षक, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें.

---

REFBK-0002189
REFBK-0002189

...,
मालक, रा... ...ी, बुधवार, पुणें.

---

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर,
'जगद्धितेच्छु प्रेस,' ५०७ शनवार पेठ, पुणें.

---

सन १९२२.

---

किंमत ६ आणे.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
२१८९

# प्रस्तावना.

———:o:———

इतर लोकांची राहाणी कशी असते ही जी मुलांना जिज्ञासा असते ती तृप्त करून त्यांचे मनांत इतर देशांविषयीं अनुराग (interest) व त्यासंबंधानें जास्त माहिती मिळविण्याची इच्छा उत्पन्न करावी या हेतूनें प्रस्तुत पुस्तक लिहिलें आहे.

प्रस्तुत पुस्तकांत पुढील सुप्रसिद्ध पुस्तकांतून ठिकठिकाणीं उतारे घेतले आहेत.

माझा युरोपचा प्रवास—लेखक, प्रोफेसर पां. दा. गुणे.
युरोपचा प्रवास— ,, सरदार मुजुमदार.
आमचा जगाचा प्रवास—लेखिका श्री. सौ० पार्वतीबाई चिटणविस.
युनायटेड स्टेट्स्‌ची लोकस्थिति व प्रवासवृत्त—लेखिका श्री० पंडिता रमाबाई.

हे उतारे घेण्यास ग्रंथकारांनीं परवानगी दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

पुणें,
१ एप्रिल १९२२.

रा. ज. गोखले.

स्थळप्रत

# उपोद्घात.

परवां आमच्या शेजारीं राहाणाऱ्या एका स्नेह्यांच्या घरीं एक मजा झाली. पाडव्याचा दिवस होता व जेवणाची वेळ झाली होती. बाबूरावानें ( स्नेह्यांच्या वडील मुलानें ) गुढीची पुजा करून तिला नैवेद्य दाखविला तेव्हां ती गंमत पाहण्याकरितां घरांतील मुलें जमलीं. त्या वेळीं मी मुलांना म्हणालों, " मुलांनो, आपल्या देशासारखे दुसरे देश आहेत, हें तुम्हांला माहीत आहेच; इंग्रज लोकांचा इंग्लंड देश, चिनी लोकांचा चीनदेश, जपान्यांचा जपान देश आहे. या सर्व देशांत आज जेवायला काय केलें असेल व या वेळीं निरनिराळ्या देशांतील लोक काय करीत असतील ? " " सगळ्यांच्या घरीं पोळ्या केल्या असतील व आतां कोणी गुढीची पूजा करीत असतील, कोणी जेवायला बसले असतील " असें भाल्यानें उत्तर दिलें. छबू म्हणाला, " आज कोणाच्या घरीं श्रीखंड केलें असेल " आणि शांती म्हणाली, "कोणाच्या घरीं जिलब्या केल्या असतील नाहीं का ? " हें ऐकून मला हसूं आलें. मी म्हणालों, "मुलांनो, तुम्हांस वाटतें कीं, जें आपण करतों तेंच जगांतील सगळे लोक करतात. आपल्याच देशांतील पार्शी, मुसलमान इत्यादि लोकांचे व आपले सण निरनिराळे आहेत; मग अगदीं निराळ्या देशांतील लोकांचे व आपले सण अगदीं एक कसे असतील ? खरोखरी असें आहे कीं, ज्या वेळीं आपल्याकडे सण असतो त्या वेळीं इतर देशांत सण नसेल एवढेंच नव्हे, तर आपली जेवावयाची वेळ झालेली असते त्या वेळीं कांहीं देशांत उजाडलेंही

नसतें, व कांहीं देशांत संध्याकाळ झालेली असते. कांहीं देशांत तर त्या वेळीं मध्यरात्र असून लोक डराडूर घोरत असतात! खाण्याच्या पदार्थासंबंधानेंही असें आहे कीं, कांहीं लोक जेवणाच्या वेळीं बहुतेक भातच खातात; तर कांहींच्या येथें जेवणांत भाताचें शीतही दृष्टीस पडत नाहीं. कांहीं अगदीं उघडेबोडके बसून जेवतात, तर कांहीं नखशिखांत कातड्याचे कपड्यांनीं आंग मढवून जेवायला बसतात. याप्रमाणें निरनिराळ्या देशांत निरनिराळी स्थिति असते. इतर देशांची माहिती नाहीं म्हणून तुम्हांस वाटतें कीं, आपणासारखी स्थिति सर्व ठिकाणीं असेल. असो. इतर देशांत कशी स्थिति असते याची थोडी माहिती व्हावी म्हणून जेवण झाल्यावर तुम्हांस कांहीं देशांची थोडी माहिती सांगेन."

जेवण झाल्यावर सर्व मुलें माझेभोंवतीं जमलीं व कबूल केल्याप्रमाणें 'आतां माहिती सांगा' असें म्हणूं लागलीं. तेव्हां त्यांना पुढें लिहिल्याप्रमाणें माहिती सांगितली. ही माहिती इतर मुलांनाही मजेची वाटेल म्हणून पुढें दिली आहे.

स्थळप्रत
२१८८


# आपले भाऊबंद
## अथवा
# जगाची ओळख.

## ब्रह्मदेश.



ब्रह्मी मनुष्य.

आपल्या हिंदुस्तान देशाशेजारीं ब्रह्मदेश नांवाचा देश आहे, त्यांतील हा ब्रह्मी मनुष्य पाहा. रोज वीस मैल याप्रमाणें एकादा मनुष्य मुंबईहून ब्रह्मदेशास पायीं चालत जाईल, तर त्यास तेथें पोंचण्यास तीन महिने लागतील; इतका तो लांब आहे.

आपल्या येथें नुकता सूर्य उगवतो तेव्हां या देशांत सकाळीं चांगलें ऊन पडलेलें असतें; तसेंच आपल्याकडे संध्याकाळीं थोडीं उन्हें असतात, तेव्हां त्यांच्याकडे दिवेलागणीची वेळ झालेली असते.

ब्रह्मी लोकांचीं घरें आपल्याहून फार निराळीं असतात. आपल्याकडे शेत राखण्याकरितां माळा करतात, त्याप्रमाणें जमिनींत कळक किंवा सागवानी सोट पुरून आणि त्यांना आडवे कळक अथवा सागवानी लाकडें बांधून जमिनीपासून ३।४ हात उंचीचा माळा करतात व त्यावर घर बांधतात; जणू काय प्राण्यांप्रमाणें यांच्या घराला पाय असतात. मात्र हे पाय दोन किंवा चार नसून अनेक असतात. घराची जमीन, भिंती वगैरे बहुतेक कळकांच्या केलेल्या असतात. माळ्याखालच्या भागांत गुरें, शेळ्या वगैरे बांधतात.



ब्रह्मी घर.

हीं कळकांचीं घरें बहुधा एकमजली असतात. माडी किंवा दुसरा मजला घरांना असत नाहीं. दुसरा मजला केल्यास बायका

आपल्या 'डोक्यावर बसतील व आपला कमीपणा होईल, अशी पुरुषांना भीति वाटते !

बहुतेक घरें कळकांचीं केलेलीं म्हणून आगीचें फार भय असतें. आगीच्या भीतीनें कांहीं घरांच्या बाहेर दोन कळक टेकवून ठेवलेले असतात; पैकीं एकास आकडा लावलेला असतो, अशासाठीं कीं, आग लागल्यास आकड्यानें वासे खालीं ओढून घर पाडतां यावें. आपटून आग विझवितां यावी म्हणून दुसऱ्या कळकाचें शेवट चपटें केलेलें असतें.

ब्रह्मदेशांत कांहीं भागांत नद्यांतून कळकांच्या ताफ्यांवर कुटुंबें राहतात; एवढेंच नव्हे तर कधीं कधीं एक लहानसें खेडेगांवही त्यांवर वसलेलें असतें व लोकांबरोबर त्यांच्या गाई, शेळ्या, कोंबडीं हीं असतात.

ह्या देशांत कळक अथवा बांबू ह्यांचें फार मोठें उत्पन्न आहे. कांहीं कळक मोठ्या माणसाच्या मांडीसारखे जाड असतात व ते ३–४ मजली घरांपेक्षां उंच वाढतात.

कळक ही ब्रह्मदेशांतील लोकांची कामधेनु म्हणजे अतिशय उपयोगी वस्तु होय. त्यांवांचून त्या लोकांचें मुळींच चालावयाचें नाहीं. घरें बहुतेक कळकांचीं केलेलीं असतात. घरांतील बरींच पात्रें (भांडीं) व टोपलीं कळकांचीं केलेलीं असतात. जाड व पोकळ कळकांच्या तुकड्यांत पाणी देखील भरून ठेवतात. कधीं कधीं कळकाचे कोंवळे शेंडेही लोक उकडून खातात !

कळकाची वाढ फारच झपाट्यानें होते. कळकाचा कोंब लहानपणीं एका दिवसांत हातभर उंच वाढतो. अशी एक गोष्ट सांगतात कीं, एक प्रवासी कळकाच्या बेटाखालीं निजतांना कळकाच्या एका

कोंबावर खुंटीप्रमाणें टोपी ठेवून निजला; व झोंप झाल्यावर उठून पाहातो तों, टोपी हातास येईना इतका उंच तो कोंब वाढला होता.

अन्न—लोकांचें मुख्य अन्न भात; भाकरी खाण्याची चाल नाहीं. त्यांना तूप आवडत नाहीं. त्यांना खारवलेले मासे फार आवडतात. परक्या माणसास ह्या माशांची फार घाण येते; पण ब्रह्मी लोक ते फार आवडीनें खातात.

लोक, चालीरीती वगैरे:—ब्रह्मी लोकांत रेशमाचे कपडे वापरण्याची चाल फार आहे. ते फार मोठ्या छत्र्या वापरतात; ह्या छत्र्या बांबूंच्या कामट्यांच्या केलेल्या असतात.

तंबाखू ओढण्याची चाल फार आहे. सर्व पुरुष तंबाखू ओढतातच, पण बहुतेक बायका व मुलेंही तंबाखू ओढतात. तंबाखूच्याविड्या फारच मोठ्या म्हणजे दोन बोटें जाड व वीतभर लांब असतात.

पुरुष मांड्यांवर गोंदून घेतात. हें गोंदणें अंगावरील दागिन्यांप्रमाणें मोठें भूषण समजलें जातें. गोंदतांना फार त्रास होतो तो सहन व्हावा म्हणून गोंदतांना अफूसारख्या पदार्थांचा कैफही करितात. गोंदण्याच्या यातनांमुळें तापदेखील येतो. पण हें सर्व सहन करून लोक गोंदून घेतात.

गोंदण्याचें काम एकाच वेळीं होत नाहीं. तें पुष्कळ दिवस करावें लागतें. गोंदतांना ज्या वेदना होतात, त्या निमूटपणें सोसल्या पाहिजेत अशी चाल आहे! गोंदतांना रडणाओरडणाराला भ्याड म्हणून समजतात.

त्यांचा धर्म बौद्ध. अहिंसा म्हणजे कोणत्याही प्राण्याचा जीव न घेणें हें बौद्ध धर्माचें मुख्य तत्त्व आहे.

या अहिंसा तत्त्वामुळें पुष्कळ अपायकारक प्राण्यांनाही त्यांच्याकडून इजा पोंचत नाहीं; उदाहरणार्थ, भातखाचरांत काम

करणाऱ्या लोकांना अळवांचा फार त्रास होतो; पण त्यांनादेखील लोक मारीत नाहींत.

मात्र त्यांना मासे आवडतात म्हणून म्हणा, अथवा ते खाल्ल्या-वांचून चालत नाहीं म्हणून म्हणा, ते मासे मारण्यास कमी करीत नाहींत. मासे मारण्यासंबंधानें कोळी म्हणतात, "आपण कांहीं माशांना मारीत नाहीं. आपण त्यांना फक्त पाण्याबाहेर काढतों. पाण्याबाहेर काढल्यानें मासे आपण होऊन मरतात त्यास आमचा काय इलाज?"

त्यांच्या पैशाचा विशेष खर्च स्वतःस रेशमी कपडे घेणें, पुंगी म्हणजे धर्मोपदेशक यांस देणग्या देणें किंवा देवालयांस देणें यां-मध्यें होतो. म्हणून या देशांत देवालयें फार आहेत.

ह्या देशांत जमीन पुष्कळ आहे, व पाऊसही पुष्कळ पडतो. यामुळें येथें भाताचें उत्पन्न पुष्कळ होतें. म्हणून पोटासाठीं लोकांना फारसे श्रम करावे लागत नाहींत. वर्षांतून महिनाभर शेतीसाठीं श्रम केले म्हणजे वर्षभर पुरेल इतकें भाताचें उत्पन्न होतें. आपल्याइकडे बाजारांत हलवा किंवा रंगूनचा तांदूळ म्हणून जाडा तांदूळ विकतो तो ह्या ब्रह्मदेशांतीलच होय.

येथें तांदूळ पुष्कळ स्वस्त आहे. हवा उष्ण आहे म्हणून लोकांस फारसे कपडेही लागत नाहींत. या कारणांमुळें हे लोक आळशी झाले आहेत. तथापि ते आनंदी व सुस्वभावी आहेत.

लोक आळशी आहेत, म्हणून ते बरींच कामें बायकांवर सोंपवितात. रस्ते करण्यांतही आळस दिसून येतो. वाटेंत जर टेकडी वगैरे एकादा लहानसा अडथळा आला, तर तो काढून टाकण्याऐवजीं, ते रस्त्यास वळण देतात.



ब्रह्मी स्त्री.

या देशांत स्त्रियांना स्वातंत्र्य फार आहे, यामुळें या देशाला 'स्त्रियांचें राज्य' असें नांव पूर्वींपासून हिंदुस्तानांतील लोकांमध्यें पडलें आहे. दुकानावर बहुतकरून स्त्रिया बसतात. नवरा सैंपाक करतो, मुलें संभाळतो व बायकोचें जेवण तिला दुकानावर पोंचवितो. लग्न झाल्यावर बायको नवऱ्याच्या घरीं जाण्याऐवजीं बहुधा नवरा बायकोच्या घरीं जातो. मात्र नवरा जेवण्यास आधीं व बायको नंतर बसते.

ब्रह्मदेशांतील भटजीस किंवा धर्मोपदेशकास पुंगी म्हणतात. या देशांत पुंगी फार आहेत. देशांत ठिकठिकाणीं मठ असतात.

ह्या मठांत पुंगी राहातात. मठांत शाळा असतात, व या शाळेंत फुकट शिकविण्याचें काम पुंगी करतात.



पुंगी.

बहुतेक मुलगे शाळेंत जातात म्हणून बहुतेक ब्रह्मी लोकांना लिहितां वाचतां येतें.

कांहीं ब्राह्मणांमध्ये मुलाची शेंडी ठेवण्याचा सभारंभ करतात त्याप्रमाणें ब्रह्मी लोकांत करतात.

इकडील ब्राह्मणांमध्यें मुलाची मुंज करण्याची चाल आहे त्याप्रमाणें ब्रह्मी लोकांमध्येंही मुंजीसारखी चाल आहे. मुलगा शाळेंत

म्हणजे पुंगीकडे शिक्षणासाठीं पाठविण्यायोग्य झाला म्हणजे हा मुंजीचा समारंभ करतात. मुंज्या मुलास चांगला पोशाक घालून वाद्यें वाजवीत, त्याची मेण्यांतून किंवा पालखींतून मिरवणूक काढ-तात. मिरवणूक मठाजवळ गेल्यावर मुलगा मठास प्रदक्षिणा घालून नंतर पुंगीकडे जातो. नंतर मुलाचे कपडे काढून त्यास लहानसें वस्त्र नेसवतात. (आपल्याकडील लंगोटी घालण्याप्रमाणेंच हा प्रकार होय ) व त्याची हजामत करवितात. नंतर मुलगा पुंगीस तीन साष्टांग नमस्कार घालतो व मला ब्रह्मचारी करा म्हणून विनंती करतो. पुंगी त्यास पिवळें वस्त्र नेसावयास देतो व त्यास एक नवीन नांव देतो. मुलगा पुंगीजवळ मठांत असेपर्यंत त्याला हें निराळें नांव चालतें. ( आपल्याइकडे मुंजा मुलालाही मुंजींतील म्हणून निराळें नांव ठेवण्याची चाल आहे. ) मात्र मठ सोडल्यावर मुलास पहिल्या नांवानेंच हाका मारतात. प्रत्येक मुलास कांहीं दिवस मठांत जोग्याप्रमाणें राहावें लागतें. नंतर त्याची इच्छा असल्यास तो पुंगी होतो किंवा शिक्षण झाल्यावर कांहीं दिवसांनंतर मठ सोडून घरीं येतो.

पुंगीच्या शाळांतून मुलींना पाठवीत नाहींत व त्यांना लिहितां वाचतां फारकरून येत नाहीं. त्यांना घरीं कापड विणण्यास शिकवितात.

मुलगी लग्नाच्या वयाची झाली म्हणजे समारंभ करतात. तिचे कान टोंचून त्यांत कुड्या घालतात व तिची एका विशेष प्रकारची वेणी बांधतात. यानंतर तिनें मुलग्यांमध्यें खेळावयाचें नाहीं अशी चाल आहे.

ब्रह्मी लोक घंटा करण्याच्या कामांत कुशल आहेत. मोठ्या घंटा या देशांत अनेक ठिकाणीं आहेत. पैकीं एक घंटा सवाशें खंडी वजनाची आहे.

# चीन.

चिनी लोक—ज्या देशांतून आपल्याकडे फटाकड्यांच्या पेट्या



चिनी शाळा.

येतात त्यास चीन असें नांव आहे. या चीन देशांतील लोकांस चिनी लोक म्हणतात. चित्रांतील चिनी गृहस्थ व त्यांचा पोशाक पाहा. आंगरख्याच्या अस्तन्या केवढ्या मोठ्या आहेत! ह्या अस्तन्यांना खिसे असतात. जोड्यांचे तळवे चिंध्यांचे किंवा कागदी पुठ्ठयांचे, व सागळ सुती कापडाची अथवा साटीण (एक प्रकारचें रेशमी कापड) ची केलेली असते.


चिनी मनुष्याची शेंडी पाहा. तिची वेणी घालून तिची बुचड्यासारखी गुंडाळी डोक्यावर केली आहे. अशा प्रकारची शेंडी ठेवण्याची चाल २।४ शें वर्षांपूर्वीं पडली.

शेंडीच्या केसांची गुंतागुंत होऊं नये म्हणून शेंडीला वेणी घालावयाची, व ती वेणी मागें सोडावयाची किंवा डोक्यावर वाटोळी गुंडाळून ठेवावयाची चाल पडली. ही शेंडी मद्रासी लोकांच्या शेंडीप्रमाणें मोठी नसून लहान असे व पुढें तिला वेणी असे. यामुळें या शेंडीला 'डुकराची शेपटी' अशा अर्थाचें नांव युरोपियनांनीं दिलें आहे.

शेंडीचा उपयोग काय हें सांगणें कठीण आहे; पण तिच्यापासून हा तोटा आहे कीं, शत्रु शेंडी धरून शेंडीवाल्यास वाकवूं शकतो, आणि याप्रमाणें भांडणांत चिनी मुलें एकमेकांच्या शेंड्या ओढीतही असत.

कुचेष्टा करणारीं माणसें, शेजारीं शेजारीं बसलेल्या किंवा निजलेल्या माणसांच्या शेंड्या एकमेकींस बांधीत!

या शेंड्या ठेवण्याची चाल वाईट आहे असें समजून अलीकडे शेंड्या ठेवण्याचें लोकांनीं बंद केलें आहे.



चिनी बायकांचा जोडा.



चिनी बाई.

सं. ग्रं. ८८

" चिनी लोकांमध्यें पुष्कळ दिवसांपासून अशी चाल आहे कीं, मुलींचीं पावलें लहानपणापासून दाबून दाबून आखूड करावयाचीं; इतकी कीं, बिचाऱ्यांना चांगलें चालतां सुद्धां येत नाहीं. आखूड आणि बारीक पाय हें चिनी बायांचें सौंदर्य समजलें जातें. बऱ्याच बायकांचे पाय मुठीएवढे असतात.* "

पाय बांधून लहान करण्याची चाल गरीब लोकांत नाहीं. कारण त्यांच्या बायकांना कामासाठीं हिंडणेंफिरणें जरूर पडतें. गरिबांच्या मुलींचें हें नशीबच समजावयाचें !

दुसऱ्यासंबंधानें फार अदबीनें अथवा आदरानें व स्वत:संबंधीं फार विनयानें म्हणजे आपल्याकडे कमीपणा अथवा लहानपणा घेऊन बोलावयाचें अशी त्यांच्यांत चाल आहे. दोन गृहस्थ भेटले असतां त्यांचें भाषण कसें होतें यासंबंधाचा एक मासला पाहा.

**प्रश्न**:—आपलें सन्मान्य वय काय?

**उत्तर**:—या मूर्खास जन्मास येऊन.... (अमुक) वर्षें झालीं आहेत.

**प्रश्न**:—आपल्या उच्च व श्रेष्ठ वृत्तीचें (धंद्याचें) नांव काय?

**उत्तर**:—माझा हलका व तुच्छ धंदा वैद्यकीचा आहे.

**प्रश्न**:—आपलें........आडनांव काय?

**उत्तर**:—माझ्या दरिद्री घराण्याचें नांव....(अमुक) आहे !

**प्रश्न**:—आपल्या सन्मान्य व विख्यात पुत्रांची संख्या किती?

**उत्तर**:—दैवाची आमच्यावर इतराजी आहे; आम्हांला एकादा ढेकूणही झाला नाहीं !

---

* सौ० पार्वतीबाई चिटणीस यांचा 'आमचा जगाचा प्रवास' या पुस्तकांतून.

चिनी लोकांचें मुख्य अन्न भात. ते वाटेल त्या प्राण्याचें मांस खातात. अमुक एक प्राणी ते खात नाहींत असें नाहीं. मुसलमान डुकराचें मांस खात नाहींत. तें चिनी लोक खातातच; पण उंदरामांजरांसारखे जे प्राणी इतर लोक खात नाहींत तेही चिनी खातात. 'बाजारांतून शेपट्या कळकांस बांधून लोंबत ठेवलेले उंदीर व मेलेलीं मांजरें विकावयास ठेवलेलीं आढळतात.' एक प्रवासी* एका चिनी फराळाच्या दुकानाचें वर्णन करतातः—


" एका बरणींत कुजलेल्या झिंग्या, एकींत घुशींच्या शेपट्या, एकींत माशांचे डोळे, एकींत काकवींत बुडविलेले कांदे व एकींत मिठाच्या पाण्यांत बुडविलेल्या गोगलगाई आणि बांबूंचे कोंवळे शेंडे आढळले. त्यांचें विशेष आवडतें खाद्य म्हणून आम्हांस दाखविण्यांत आलें तें वाळवलेले सरड होतें ! "

**राहणी वगैरेः**—चिनांत घरें बहुधा एकमजली असतात. श्रीमंत मनुष्याचें घर एकच मोठी इमारत नसून तें निरनिराळ्या एकाशेजारींएक असलेल्या अनेक कौलारू खोल्या मिळून झालेलें असतें. घर बांधण्यांत कळकांचा उपयोग फार, म्हणून त्यांना आग लागण्याची भीती फार; ह्यास्तव निरनिराळीं दालनें एकमेकांस जोडून न बांधतां तीं निरनिराळीं स्वतंत्र बांधण्याची चाल पडली असावी.

चिनी घराच्या मध्यभागीं भट्टी अथवा चूल असते. ती कट्ट्याप्रमाणें बांधून काढलेली असून एका बाजूस धुराडें असतें. भट्टीचा

---

* ए. आर्नोल्ड.



चिनी बंगला.

वरचा भाग म्हणजे वरची जमीन गरम असते, म्हणून तिच्यावर हिंवाळ्यांत लोक बसतात, जेवतात व निजतात.

ह्या देशांत वस्ती फार दाट आहे; म्हणजे गांवें व शहरें फार जवळजवळ व गांवांत घरांना पाहिजे तेवढी जागा मिळत नाहीं. शेतें करण्यास जमीनही पाहिजे तितकी मिळत नाहीं. चिनीलोक सर्व प्रकारचे प्राणी खातात, याचें कारण अन्नाची दुर्मिळता; जी थोडी जमीन मिळते तिच्यांतून पुष्कळ पीक काढावें लागतें, म्हणून लोक शेतकी फार हुशारीनें करतात. याच कारणानें ते फार उद्योगीही झाले आहेत.

**समजुती व चालीरीती**—मुलगा झालेला आईबापांना फार आवडतो. मुलगी जन्मास येणें हें आईबापांचें दुर्दैव समजतात. कांहीं आया तर मुलगी झाली असें समजतांच रडतात.

मुलांचा वाढदिवस त्यांच्या जन्माच्या दिवशीं न करतां वर्षाच्या पहिल्या म्हणजे पाडव्याच्या दिवशीं करतात.

पाडवा हा मोठा सण मानतात. या दिवशीं मुलांना खाऊसाठीं पैसे देतात. ह्या पैशांचे मुलें फटाकडे घेऊन ते उडवितात. या दिवशीं जिकडे तिकडे फटाक्यांचा फडफडाट ऐकूं येतो.

फटाक्यांच्या आवाजानें घरांतील भूतपिशाचें पळून जातात अशी कांहीं चिनी लोकांची समजूत आहे.

मूल जन्मास आल्यावर जो पहिला पाडवा किंवा वाढदिवस येईल त्या दिवशीं जेवणखाण झाल्यावर एका ठिकाणीं पुस्तकें, ताजवा, जोडे, सोन्याच्या गुंड्या वगैरे अनेक पदार्थ मांडून ठेवून त्यांत मुलाला सोडतात, व भोंवतालीं घरांतील माणसें जमतात. या पदार्थांपैकीं ज्या पदार्थांस मूल प्रथम हात लावील त्यावरून तो मुलगा कोणता धंदा करणार हें ठरवितात. मुलानें सोन्याच्या गुंड्या उचलल्या तर तो मोठा अधिकारी होणार, पुस्तकास हात लावला तर तो मोठा विद्वान् होणार....अशी त्यांची समजूत असते.

पंचांगावरून शुभ दिवस पाहून मुलाला शाळेंत घालतात. शाळेंत मुलाला नवें नांव ठेवतात व त्याच नांवानें त्याला मुलें हाक मारतात. घरीं मात्र त्यास त्याच्या मूळच्या ( ज्याला दूधनांव म्हणतात त्या ) नांवानें हाक मारतात. कधीं कधीं मनुष्याचें लग्न झाल्यावर किंवा त्यानें एकादी मोठी परीक्षा दिल्यावर त्याचें आणखी एक नांव ठेवतात.

मुलगा प्रथम शाळेंत जातो तेव्हां पंतोजींना तीनदा वाकून नमस्कार करतो. शाळेंत धडा तयार झाला म्हणजे विद्यार्थी पंतोजीजवळ जातो व शिक्षकाकडे तोंड न करतां पाठ करून धडा म्हणतो ! ( ९ पानावरील चित्र पाहा. ) शिक्षकापुढलें पुस्तक दिसूं नये म्हणून शिक्षकाकडे पाठ करण्याची चाल असावी. हें 'पाठ करणें' खरें !

धडा म्हणतांना आठवेनासें झालें कीं, चिनी मुलें डोकें खाजविण्याऐवजीं पाय खाजवितात !

चिनी लिपी आपल्या उलट, उजवीकडून डावीकडे व खालून वर लिहितात. आपल्याकडे पुस्तकाचें जें शेवटचें पान तें त्यांचेकडे पहिलें पान असतें.

चिनी लिपींत प्रत्येक शब्दास निराळी खूण असते, म्हणून भाषेंत जेवढे शब्द तेवढ्या खुणा चिनी लिपी लिहिण्यास लागतात. चिनी भाषेंत शब्द सुमारें ४० हजार आहेत. यास्तव चिनी भाषा पूर्णपणें लिहितांवाचतां येण्यास ४० हजार खुणांची अथवा चिन्हांची माहिती करून घ्यावी लागते. हें काम फार अवघड असल्यामुळें फार थोड्या लोकांना कोणतेंही चिनी पुस्तक पूर्णपणें वाचतां येतें. शेतकरी वगैरे अडाणी लोक सुमारें हजार शब्दांच्या चिन्हांची माहिती करून घेतात. तेवढ्यांवर त्यांचें बहुतेक काम भागतें.

चिनी मुलांचे बरेच खेळ इकडील मुलांच्यासारखेच आहेत. मात्र पतंगाचा खेळ खेळण्याचा त्यांना फार शोक आहे. ह्या पतंगाचे आकारही अनेक प्रकारचे व फार मजेचे असतात.

वर्षांतील एक दिवस, पतंगाचा सण म्हणून, राखून ठेवलेला असतो. ह्या दिवशीं उजाडण्याची वाट मोठ्या उत्सुकतेनें मुलें पाहातात व उजाडतांच आपापले पतंग घेऊन रानांत जातात. ते दिवसभर पतंग उडवितात व रात्र झाली म्हणजे पतंगाच्या सड्यांत

(दोरींत) कागदांचे रंगीत कंदील अडकवितात. हे कंदील वर चढले म्हणजे रात्रीं फारच मजा दिसते.

**चिनी औषधें**–चिनी वैद्यांचीं औषधें मोठीं गमतीचीं असतात. वाळलेले साप, विंचू, बेडूक, गोमा, सरड, गांडूळ, वाघाचे दांत, केस, नखें वगैरे पदार्थ औषधांसाठीं म्हणून वैद्यांच्या दवाखान्यांत ठेवलेले आढळतात. लहान मुलांसाठीं झुरळ हें एक मोठें उपयोगी औषध आहे असें समजलें जातें.

आंगीं धैर्य येण्यासाठीं वाघाचे हाडांचा, पोटांत वात धरतो त्यावर अस्वलाचे पंज्याचा व तापावर विंचवाचा काढा देण्याचीही त्यांच्यामध्यें चाल आहे.

एक ग्रंथकार लिहितात "एका बाईचे डोळे दुखत होते. तिनें पुष्कळ औषधें केलीं. शेवटीं तिला ज्या औषधानें गुण आला तें हें कीं रोज हिरवे लहान बेडूक जिवंत गिळावयाचे. 'रोज ३ ते ६ प्रमाणें सुमारें पन्नास बेडूक खाल्ले तेव्हां डोळ्यांतील दुःख थांबलें' असें ती बाई सांगत होती."

**कांहीं चमत्कारिक चाली**––कुटुंबांतील माणसें बरीं आहेत तोंपर्यंत वैद्यास पैसे द्यावयाचे, व कोणी मनुष्य आजारी पडलें कीं, तें बरें होईपर्यंत वैद्याचा पगार बंद करावयाचा.

शिक्षा झालेल्या गुन्हेगारास बदली देतां येतो; व पैसे घेऊन दुसऱ्याची शिक्षा भोगणारे इसमही मिळतात. फटक्यांची शिक्षा भोगण्यास बदली मिळतातच, पण मिळणाऱ्या पैशानें आपलें कुटुंब दारिद्र्यांतून मुक्त होईल, या आशेनें दुसऱ्याची देहांत शिक्षा भोगण्यासही दरिद्री लोक तयार होतात.

श्रीमंतीचा डौल मिरविणारे लोक आपलीं नखें न काढतां बरींच लांब वाढूं देतात. ज्यांस पोटाकरितां हातानें काम करावें



चिनी स्त्री.

लागतें त्यांचीं नखें लांब वाढावयाचींच नाहींत; म्हणून लांब नखें हें श्रीमंतीचें लक्षण समजलें जातें.

प्रेत चिनांत पुरल्यावांचून मनुष्य स्वर्गास जात नाहीं या समजुतीनें परदेशांत मेलेल्या चिनी मनुष्याचें प्रेत त्याचे वारस पेटींत घालून चिनांत नेतात. परदेशीं राहणाऱ्या एकाद्या चिनी माणसाचें बोट तुटलें, तर तुटलेलें बोटही स्वर्गामध्यें उपयोगीं पडावें म्हणून आपल्या प्रेताबरोबर चिनांत पुरण्यासाठीं तें मनुष्य तें डबींत जपून ठेवितो.

कधीं कधीं मनुष्याचें प्रेत घरांत कित्येक दिवस ठेवून त्याचा समारंभ करतात.

कांहीं लोक आपणास ज्या पेटींत पुरून ठेवावयाचें ती पेटी विकत घेऊन घरांत चांगल्या सामानामध्यें ठेवून देतात !

एकादा मनुष्य माडीवर मेला, तर त्याचें प्रेत खिडकींतून खालीं सोडतात. कारण जिन्यानें मृत मनुष्यास खालीं नेलें तर त्याच्या पिशाच्यास ती वाट माहीत होऊन तें परत जिन्यानें येईल ! त्यास खिडकींतून सोडलें तर जिन्याची माहिती होणार नाहीं व खिडकींतून तर त्यास येतां येणार नाहीं असें त्यांस वाटतें !!

एकादा मनुष्य मरणोन्मुख झाला, तर त्याचे देणेकरी पैसे आणून देऊन ऋणांतून मुक्त होतात. कारण पैसे न दिल्यास त्याचें भूत आपणास त्रास देईल, अशी त्यांना भीति वाटते.

**राज्यव्यवस्था वगैरे**–१९१२ सालापर्यंत या देशावरील मुख्य अधिकारी बादशाहा होता. आतां मुख्य अधिकारी लोकच निवडतात.

या देशांतील प्रांतावरील मुख्य अधिकाऱ्यास मँडारिन म्हणतात. जुन्या कारकीर्दींत या मँडारिनला अधिकार किती असे व लोक त्यास किती भीत हें पुढील वर्णनावरून कळून येईल.

" मँडारिनची स्वारी रस्त्यानें जाते तेव्हां त्याच्याबरोबरचे शिपाई तास वाजवितात व तोंडानें 'आय ओ' असें ओरडत जातात. तो आवाज ऐकल्याबरोबर सर्व लोक बाजूला होऊन रस्ता सोडतात. मँडारिनबरोबरच्या शिपायांजवळ चाबूक व बिड्या असतात व रस्त्यानें जाणाऱ्या माणसानें मँडारिनची अदबी बरोबर राखली नाहीं तर ते त्याला लागलींच फटके मारतात किंवा त्याच्या पायांत बिड्या घालून त्याला तुरुंगांत टाकतात."

**लोकांचे गुण, कलाकौशल्य इ०**—चिनी लोकांच्या कांहीं गोष्टी जरी आपणांस चमत्कारिक दिसल्या, तरी त्यांच्याविषयीं आदर उत्पन्न करणाऱ्या पुष्कळ गोष्टी आहेत. त्या पुढील-प्रमाणें:—

चिनी लोक फार उद्योगी व सहनशील आहेत. ते आईबापांना व पूर्वजांना फार मान देतात. चिनी व्यापारी प्रामाणिकपणाविषयीं फारच प्रसिद्ध आहेत. चीन देश फार प्राचीनकाळापासून सुधार-लेला आहे. कित्येक उपयोगी व फार महत्त्वाच्या कला युरो-पियन देशांत माहीत होण्यापूर्वीं त्यांना माहीत झाल्या होत्या. चिनी लिपी चिनांत आज ४ हजार वर्षें चालू आहे. काशाचे पुतळे ओतण्याची कला व होकायंत्र यांची माहिती त्यांना ३ हजार वर्षांपूर्वीं झाली होती. कागद तयार करण्याची कला त्यांना जवळजवळ २ हजार वर्षें माहीत आहे. छापण्याची कला इंग्लिशांना पांचशें वर्षांपूर्वीं माहीत नव्हती, पण ती चीनमध्यें सुरू झाल्यास हजारां-हून जास्त वर्षें होऊन गेलीं आहेत. नकाशे घातलेलें चीनच्या भूवर्णनाचें पुस्तक चीनमध्यें हजार वर्षांपूर्वीं तयार केलें होतें! उत्कृष्ट चिनी मातीच्या भांड्यांविषयीं तर चीनची फारच ख्याति आहे. कांहीं चिनीमातीच्या जुन्या भांड्यांवरील रंग व झिलई इतकी उत्कृष्ट

आहे कीं, तशी आज कोणासही साधत नाहीं. अशा प्रकारच्या एका पेल्यास कलेचे शौकी लोक १०।१९ हजार रुपये किंमत देतात !

चिनांत प्राचीनकाळीं लिहिलेलीं व छापलेलीं पुस्तकें अतिशय आहेत. चीनच्या एका बादशाहाच्या लायब्ररींतील पुस्तकांचा क्याट-लाग म्हणजे याद तयार करण्यास १२२ वह्या अथवा पुस्तकें लागलीं असें सांगतात !

---

## जपान

बाजारांतील आगगाड्या व मोटारी वगैरे खेळणीं, पंखे, आगपेट्या हे जिन्नस कोणत्या देशांतून येतात ? हे जपान नांवाच्या देशांतून येतात. यांतील लोकांना जपानी म्हणतात.

हा देश चीनजवळ आहे, मात्र हा दश व चीन यांमध्यें समुद्र आहे. हा देश अनेक लहान मोठीं बेटें मिळून झालेला आहे.

**लोकांचे गुण**—जपानी लोक नाकाडोळ्यांनीं जरी चिनी लोकां-सारखे आहेत, तरी पुष्कळ गोष्टींत ते चिनी लोकांहून निराळे आहेत. चिनी लोकांत स्वच्छता कमी, तर जपानी लोकांत ती उत्तम प्रकारची. इतकी स्वच्छता दुसरीकडे कोठेंही दृष्टीस पडत नाहीं. जपानांत इतर लोक दिवसांतून एकदां स्नान करतात, तर मजूर दोनदां स्नान करतात; एकदां सकाळीं व एकदां काम झाल्यानंतर संध्या-काळीं. यामुळें जपानी मजूर आपल्या शेजारीं आगगाडींत किंवा ट्राममध्यें बसला, तर त्याच्याबद्दल किळस कधींही वाटत नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
. २९८०....
ग्रं. क्र.

कांहीं जपानी लोक दांतही दोनदां घासतात; एकदां सकाळीं व एकदां रात्रीं.

" जपानी लोक आपलीं दुकानें, घरें व सभोंवतालची जागा वगैरे चांगलीं स्वच्छ ठेवितात. घरांतून आणि दुकानांतून बांबूच्या लहान लहान लाकडांचीं खोडें कोरून त्यांच्या केलेल्या पिकदाण्या ठेविलेल्या असतात. कोणालाही थुंकावयाचें असलें तर त्यानें त्यांत थुंकावें; वाटेल तेथें थुंकावयाचें नाहीं अशी चाल आहे. घरांतील केरकचऱ्याकरितां ज्या जागा मुक्रर (=कायम) केलेल्या असतील तेथें नेऊन तो टाकला पाहिजे. यामुळें लहान सहान गल्ल्या, बोळ, घराच्या आसपासची जागा वगैरे चांगलीं साफ राहातात. ‡ "

जपानी लोक मोठे देशभक्त, राजनिष्ठ व सभ्य म्हणून जगांत प्रख्यात आहेत.

ते मोठे उद्योगी आहेत. वाडवडिलांनीं मिळविलेल्या पैशाच्या व्याजावर किंवा उत्पन्नावर निर्वाह करून केवळ चैन करण्यांत जन्म घालविणारे लोक त्यांच्यांत आढळत नाहींत. सर्व लोक नेहमीं उद्योगांत व आपली सुधारणा करण्यांत गढून गेलेले दिसतात. ':सर्व राष्ट्र एकाद्या राक्षसाप्रमाणें काम करीत आहे असा भास होतो' असें एका प्रवाशानें ह्या लोकांच्या उद्योगीपणाचें वर्णन केलें आहे.

थोड्या वर्षांपूर्वीं रशियाशीं झालेल्या युद्धांत एकदां एक धोक्याचें काम करण्यासाठीं कांहीं लोक हवे होते. म्हणून तें काम खुषीनें करणाऱ्या लोकांचे अर्ज मागितले. त्यावेळीं शेंकडों लोकांचे अर्ज आले; एवढेंच नव्हे तर एकानें देशासाठीं प्राण खर्चीं घालण्यास आपण किती उत्सुक आहों हें दाखविण्याकरितां आपल्या

---

‡ सौ० पा० चिटणीसकृत 'आमचा जगाचा प्रवास.'

आंगाचें रक्त काढून त्यानें अर्ज लिहिल्याचें अर्जांत कळविलें होतें !

देशासाठीं मरावयास न भिणें हा सद्गुण मुलांस शिकविणें, ही मुलांच्या शिक्षणांतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय असें आई-बाप समजतात. शौर्य व मरणास न भिणें या गोष्टींस जपानांत किती महत्त्व आहे याविषयीं पुढील गोष्ट पाहा. ‡

" कुमागे या जपानी वीरानें एका लढाईत शत्रूकडील एका इसमास पकडलें. पकडलेला मनुष्य आपल्या बरोबरीचा असल्या-वांचून त्यास मारूं नये असा त्या काळच्या जपानी लोकांचा नियम असल्यामुळें त्या पकडलेल्या इसमास त्याचें नांव विचारिलें. तो पकड-लेला मनुष्य तरुण मुलगा होता. हा मुलगा आहे असें आपल्या नांवावरून शत्रूस कळल्यास तो आपल्यास मारणार नाहीं व परा-भव पावून जिवंत राहिल्याबद्दल आपली बेअब्रू होईल यास्तव त्या मुलानें आपलें नांव सांगण्याचें नाकारिलें. म्हणून त्याचें शिर-स्त्राण उघडून पाहतां ओठाच्यावरचा जारही ज्याचा वाळला नव्हता अशा एका सुंदर मुलाचा चेहरा पाहून कुमागे कचरला व किंचित् मागें वळून त्याला म्हणाला, ' बाळा, आमच्या तरवारीला तुझ्या रक्ताचा विटाळ नको. माझे लोक तुला येऊन गांठण्यापूर्वींच तूं जा आणि आपले प्राण वांचीव. ' पण तो बाळ ऐकेना. त्यानें उलट कुमागेची प्रार्थना केली ' आपण मला ठार करावें म्हणजे त्यांतच दोघांचीही (तुमची शत्रु जिंकल्याबद्दल व माझी धैर्याबद्दल) अब्रू राहील. ' कुमागेनें आपली तरवार मन घट्ट करून वर उचलली; परंतु तरवार पुढें सरेना ! कुमागेचा हात कांपूं लागला ! कुमागेनें त्या मुलाला ' अजून तरी जा ' म्हणून विनविलें, परंतु व्यर्थ. लढा-

---

‡ ' जपानची मर्दुमकी ' या पुस्तकांतून.

ईतून परत जाऊन आपलें काळें तोंड घरीं आईबापांना दाखविण्याचें त्या वीरतनयाच्या मनांतसुद्धां आलें नाहीं. अखेरीस आपल्या सोबत्यांच्या घोड्यांच्या टापा ऐकूं येऊं लागल्यावरून कुमागे त्याला म्हणाला, 'तुला जर त्यांनीं पकडलें तर तुला माझ्यापेक्षां हलक्या दर्जाच्या माणसाच्या हातून मृत्यु येईल, त्यापेक्षां हे परमेश्वरा, तूं आतां या बाळाला आपल्या चरणाजवळ जागा दे.' असें म्हणून कुमागेनें तरवारीचा एक हात फिरविला व ती तरवार त्या तरुणाच्या रक्तानें लाल झाली"!!!

मुलांनो, भ्याडपणा करण्याचें तुमच्या मनांत येईल तेव्हां वरील गोष्टीची आठवण करा.

ते लोक बादशाहाला इतके पूज्य मानतात कीं, त्याच्याकडे पाहाणें हें त्याच्यामध्यें व आपल्यामध्यें फार फरक नाहीं असें दाखविण्यासारखें आहे अशा समजुतीनें ते बादशाहाकडे पाहात नाहींत. बादशाहाची मिरवणूक निघाली, तर एखाद्या दिव्य तेजापुढें डोळे दिपूं नये म्हणून मान वाकवावी, त्याप्रमाणें मान वाकवून ते उभे राहातात.

"रशियाशीं झालेल्या लढाईपासून जपानमध्यें लोकांवर जबर कर बसविले आहेत परंतु त्याचें त्यांना कांहींच वाटत नाहीं. ते म्हणतात 'राजानें आमच्या कल्याणाकरितां व आमच्या हिताकरतांच कर बसविले आहेत. तेव्हां ते आम्हांला सोसलेच पाहिजेत."

दोनचार वर्षांपूर्वीं जपानचे नवीन बादशाहा गादीवर बसले. त्या वेळीं जपानांत प्रवास करीत असलेल्या एका गृहस्थांनी पुढीलप्रमाणें त्या प्रसंगाची हकीकत लिहिली आहे.

"देशावरचें व बादशाहावरचें प्रेम पाहून फार आश्चर्य वाटलें. त्या प्रवासाच्या दिवशीं मी ज्या गांवांतून गेलों, त्यांमध्यें उत्सव नव्हता असें एकादें खेडेगांव तर राहूंद्या, पण असें एकादें घर देखील

दृष्टीस पडलें नाहीं. समारंभाची वेळ होतांच सर्व घरांतून व शेतांतून 'जयजयकाराचा' प्रचंड आवाज निघाला. आमच्या आगगाडीमधील सर्व जपानी लोक उभे राहिले, व त्यांनीं 'जयजयकाराच्या' ओरडण्यानें सर्व गाडी दणाणून सोडली!"

त्यांच्यांत सभ्यपणा फार आहे. एकमेकांस शिवीगाळ केलेली जपानांत क्वचित्च दृष्टीस पडते. मोलकरीणलादेखील हाक मारतांना '-सान' हें बहुमानाचें उपपद नांवापुढें लावून तिला हाक मारतात. 'मोलकरणीला मालक एकाद्या राजकुमारीप्रमाणें वागवितात,' असें एका युरोपियन लेखकानें म्हटलें आहे.

दरवाज्यांतून जातांना समोरून दुसरा मनुष्य आला तर आपण बाजूला होऊन दुसऱ्यास आधीं जाऊं द्यावयाचें अशी त्यांची चाल आहे.

कोणी पाहुणा आला असतां मोलकरीण त्याचे जोडे काढून त्याला दिवाणखान्यांत अगर बसण्याचे खोलींत घेऊन जाते व आंत बसण्यास विनंती करते. पाहुणा आल्याबरोबर त्याचेपुढें चहाची किटली, कप व तंबाखू पेटविण्याकरितां एक लहानशी शेगडी ठेवण्याची चाल आहे. त्याप्रमाणें करून मोलकरीण पाहुणा आल्याची बातमी मालकास कळविते.

यजमान खोलींत आल्याबरोबर पाहुणे व यजमान दोघेही एकमेकांपुढें बसून जमिनीपर्यंत लवून एकमेकांस प्रणाम म्हणजे नमस्कार करितात व कुशल प्रश्न विचारतात. पाहुण्याकडून पूर्वीं मेजवानी, नजर अगर कोणत्याही प्रकारची मदत मिळालेली असल्यास त्याबद्दल यजमान प्रथम त्याचे आभार मानतो व नजर अगर मेजवानी फारच उत्तम प्रकारची होती व मदत अगदीं वेळेवर झाली असें सांगतो; व पाहुणा त्या गोष्टी अगदीं यःकश्चित

होत्या व त्याबद्दल आभार मानण्याचें बिलकूल कारण नाहीं असें सांगतो. नंतर ते घरांतील मंडळी, मुलेंबाळें वगैरे मंडळींचें कुशल एकमेकांस विचारतात. ह्या वेळपर्यंत प्रत्येक प्रश्नाबरोबर दोघेही एकमेकांस जमिनीपर्यंत डोकें टेकून नमस्कार करीत असतात व असे निदान ३।४ नमस्कार होतात. नंतर इतर गोष्टी बोलण्यास सुरवात होते.



**जपानी मोलकरणीनें काढलेलें चित्र.**


चित्रें काढण्यांत जपानी लोकांइतके हुषार लोक कोणीही नाहींत. ते चित्रें फार थोड्या वेळांत व फार सुबक काढतात. चित्रें काढण्याचा नाद तिकडे बहुतेक लोकांना आहे. घरांतला एकादा गडी चित्रें इतकीं चांगलीं काढतो कीं, थोडें ड्राइंग शिकलेल्या इकडच्या मनुष्यासही तशीं काढतां यावयाचीं नाहींत. जपानांत गेलेल्या एका हिंदी गृहस्थाच्या मोलकरणीनें काढलेलें चित्र शेजारीं दिलें आहे तें पाहा.

“ जपानमध्यें युरोपियन देशांप्रमाणें सर्व सुधारणा दृष्टीस पडतात. टेलिफोन आणि तारायंत्रें जिकडेतिकडे आहेत. लहान लहान दुकानांतून आणि रस्त्यारस्त्यांनीं लहान लहान पोलिसांच्या ज्या झोंपड्या असतात त्यांत देखील टेलिफोनची व्यवस्था असते. †”

† ‘ आमचा जगाचा प्रवास. ’

देशाचें स्वरूप—हा देश आपल्या देशाहून बराच निराळा आहे. नद्या व ओढे पुष्कळ आहेत व तेथें पाऊस वारंवार पडतो. पाऊस पडल्यावांचून एक महिना बहुधा जात नाहीं. पावसाच्या मोठमोठ्या सरी न पडतां पाऊस झिमझिम पडतो. पाऊस वारंवार पडतो यामुळें नद्या आपल्या इकडच्याप्रमाणें उन्हाळ्यांत कोरड्या पडत नाहींत. तसेंच जमीनही नेहमीं हिरवीगार राहाते.

ह्या देशांत टेकड्या व डोंगर फार आहेत यामुळें बहुतेक प्रदेश उंचसखल आहे. त्यांत सपाट मैदानें बहुधा नाहींतच. म्हणून सपाट रस्ते फार थोडे. रस्त्यांना चढउतार फार म्हणून बैलांच्या किंवा घोड्यांच्या गाड्या रस्त्यांवरून चालूं शकत नाहींत. यास्तव तेथें लहान गाड्यांचा उपयोग करतात व त्या माणसें ओढतात. या गाड्यांना रिक्शा म्हणतात. रिक्शा ओढणारे जपानी लोक फार जलद चालतात.



रिक्शा अथवा हातानें ओढावयाची गाडी.

जपानांत घोडे व बैल इतके कमी आहेत कीं, रस्त्यांतून बसावयाच्या व ओझ्याच्या गाड्याही ओढतांना माणसें दृष्टीस पडतात. गाड्या ओढणारीं माणसें घोड्याइतकी रोज मजल मारतात.

**घरें**—ज्वालामुखी पर्वतांच्या सान्निध्यामुळें जपानांत धरणीकंप होतात. म्हणून तेथें घरें दगडाविटांची न बांधतां बांबू, फळ्या व जाड कागदी पुठ्ठे यांचीं बांधतात.

घरांतील खोल्यांच्या भिंती, आडव्या लाकडांतील खोबणीं-तून सरकणाऱ्या जाड कागदी पुठ्ठ्यांच्या केलेल्या असतात. यामुळें जरूर पडेल तेव्हां भिंती काढून दोन किंवा अधिक खोल्यांची एक मोठी खोली किंवा दालन करतां येतें.

जपानी घरांतून कांहीं गोष्टी आपल्या इकडच्याहून फार निराळ्या दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ—उशा कापडाच्या नसून लाकडाच्या केलेल्या असतात ह्या लाकडी उशांना पाय लावावयाचा नाहीं अशा त्यांची चाल आहे. पायमोज्यांना अंगठ्यासाठीं निराळें शेवट किंवा निराळी पिशवी असते. जपानांतील जुन्या तऱ्हेच्या घड्याळांत कांटे न फिरतां तबकडी फिरते. घरांतील भांडीं तांब्यापितळेचीं नसून चिनी मातीचीं असतात.

**पोशाक, खाणें वगैरे**—जपानांत मुलगे व मुली यांचा पोशाक एकाच तऱ्हेचा असतो; फरक काय तो कापडाच्या रंगांत; मुलांच्या पोशाकाचा रंग पिवळा व मुलींच्यांचा तांबडा असतो.

जपानी लोक घरांत गवताचे जोडे किंवा जाड पायमोजे वापरतात व घराबाहेर कोरड्या हवेंत चेपल्या व पाऊस असेल तर उंच खडावा वापरतात.

" यांच्या जेवणाचे पदार्थ म्हणजे मुख्यतः भात, कोणत्यातरी प्रकारच्या माशांची भाजी व तांदळाच्या पिठाचे कांहीं पदार्थ आणि दुधासाखरेशिवाय नुसता चहा, झालें. आपल्यासारख्या

त्यांना पुष्कळ भाज्या, चटण्या, कोशिंबिरी, पापड, दहीं, दूध वगैरे कांहीं लागत नाहीं. "*

जपानी लोक भात हातानें किंवा चमच्यानें न खातां एका प्रकारच्या लांब काड्यांनीं खातात. या काड्या कळक किंवा लाकूड यांच्या केलेल्या असतात. दोन काड्या एका हातांत धरून ते भाताचे गोळे उचलतातच पण शितेंही वेचून खातात !



जपानी मुलें.

जपानी लोक मुलांना फार प्रेमानें व आदरानें बागवितात व मुलेंही फार शांत असतात. तान्हीं मुलें रडतांना क्वचित् दृष्टीस पडतात. म्हणून मुलें सांभाळण्याचा त्रास आईबापांना फारसा नसतो. ७।८ वर्षांच्या मुलाच्या पाठकुळीशीं त्याचें तान्हें भावंड बांधतात व तें चिमुकलें ओझें घेऊन मूल सर्व दिवस हिंडत खेळत असतें. मुलें फार शांत व आज्ञाधारक असतात, म्हणून मुलांना शिक्षा करण्याचे प्रसंग कमी येतात.

---

* ' आमचा जगाचा प्रवास. '

जपानी मुलांना पतंग उडविण्याचा फार नाद आहे. हे पतंगही अनेक प्रकारचे मोठे मजेचे केलेले असतात.

जपानमध्यें पंख्यांचें फार महत्त्व आहे. बायकांच्या हातांत घडीचा पंखा हा असावयाचाच. पंखा निरनिराळ्या वेळीं कसा धरावयाचा हें मुलींना मुद्दाम शिकवितात.

खोली सुशोभित करण्यासाठीं खोलींत फुलें कशीं ठेवावयाचीं, चहा कसा ओतावयाचा व पाहुण्यास कसा द्यावयाचा यांसंबंधानें पुष्कळ बारीकसारीक नियम जपानांत आहेत. हें काम मुलींचें आहे म्हणून तेंही मुलींना मुद्दाम शिकवितात.

सण—पाडवा हा जपानांतील एक मोठा सण होय. पाडव्याचे आधीं एकूण एक घरें झाडून पुसून अगदीं स्वच्छ करतात. पाडवा येतांच तोरणें, फांद्या, फुलें घरांवर बांधून घरें सुशोभित करतात. दारावर एक प्रकारचा खेकडा बांधतात. हा प्राणी दीर्घायुष्य दाखविणारा आहे व तो बांधल्यानें घरांतील सर्व माणसांस दीर्घायुष्य प्राप्त होतें, अशी समजूत आहे.

पाडव्याच्या आधल्या दिवशीं रात्रीं बारा वाजतांच, नवीन वर्षास आरंभ झाला म्हणून देवळांतून घंटा वाजवितात.

लोक ह्या दिवशीं मित्रांना व नातेवाइकांना भेटावयास जातात व मुलांना खाऊ व देणग्या देतात. दिवसा मोठमोठ्या मेजवान्या होतात. रात्रीं जिकडे तिकडे रस्त्यांतून व झाडांमधून कागदाचे कंदील लावतात, त्यांची फारच मजा दिसते.

मुलग्यांचा मुख्य सण पतंगांचा किंवा कार्प माशांचा सण हा होय. तो मे महिन्याच्या पांचव्या तारखेस असतो. ह्या दिवशीं ज्यांना मुलगे आहेत त्यांच्या दरवाजांशीं, कागदाचे अगर कापडाचे मासे बांधलेल्या गुढ्या उभ्या करतात व कार्प माशाच्या


आकाराचे पतंग करून मुलगे खेळतात. हा मासा शुभदायक किंवा यश देणारा आहे अशी लोकांची समजूत आहे.

बाहुल्यांचा सण हा एक जपानांतील मुलींचा प्रसिद्ध सण आहे. हा सण ३ मार्चला असतो. त्या दिवशीं घरांतील सर्व बाहुल्या काढून, त्यांना चांगले चांगले पोशाक घालून, त्यांच्यापुढें तांदूळ, फराळाचें व फळें वगैरे ठेवितात व गौरीप्रमाणें आरास करतात. या दिवशीं घरांतील सर्वांत जुनी जी बाहुली असेल तिचें फार महत्त्व मानतात व मुख्य मानाची जागा तिला देतात.

चेरी नांवाच्या झाडांना मोहोर येतो तेव्हां एक मोठा सण असतो. हा मोहोर फारच सुंदर दिसतो.

एका ठिकाणीं नदीच्या दोन्ही तीरांवर चेरी झाडांच्या मोठमोठ्या राई आहेत, व या ठिकाणीं शेंकडों नव्हे तर हजारों जपानी लोक मोहोराची शोभा पाहाण्यास येतात. ते होडींत बसून मजा पाहात नदींतून जातात. बरोबर छान छान फराळाचें आणलेलें असतें तें घेऊन लोक तेथें वनभोजनें करतात व सर्व दिवस मजा करतात.

**लिपी**—चिनी व जपानी लिपीसंबंधानें एक मजेची गोष्ट ही कीं, दोन्ही भाषांत लिपी एकच आहे, पण उच्चार मात्र निराळे. उदाहरणार्थ:—एकाच चिन्हाचा चिनी व जपानी या भाषांत मनुष्य



जपानी लिपीचा नमुना.

असा अर्थ आहे. पण याचा उच्चार चिनी लोक व जपानी लोक निरनिराळा करितात. एवढेंच नव्हे तर चीनच्या निर निराळ्या भागांमध्येंही याचे भिन्न उच्चार आहेत; उदाहरणार्थ—मनुष्य या अर्थी चिनी शब्दाचे कंतानमध्यें 'याङ्' व निंगपो येथें 'निङ्' असे उच्चार आहेत. मागील पानावरील जपानी लिपीचा नमुना पाहा.

आकृतींतील चार चिन्हांचे उच्चार अनुक्रमें १ शो ( अर्थ लहान किंवा प्राथमिक), २ गाकु (म्हणजे शाळा), ३ नि (म्हणजे सूर्य) व ४ होन ( म्हणजे उत्पत्तिस्थान ) असे आहेत. शो गाकु म्हणजे लहान मुलांची शाळा; व निहोन म्हणजे सूर्याचें उत्पत्तिस्थान अथवा जपान.



बुद्धाचा प्रचंड पुतळा—जपान.

प्रचंड पुतळ्यांविषयीं जपान प्रसिद्ध आहे. जपानांत बुद्धाचा एक पुतळा फारच प्रचंड आहे. ह्याची उंची ९० फूट व वजन ७ शें खंडी आहे. बुद्धाचें नाक एवढें मोठें आहे कीं, त्यांत मनुष्यास सहज शिरतां येतें. डोळ्यांची लांबी २ हात आहे !

---

## निर्जल-प्रदेश.

( पूर्व तुर्कस्तानांतील टाकला मकान नांवाचा निर्जल-प्रदेश. )

ह्या वेळपर्यंत सांगितलेल्या देशांच्या अगदीं उलट कांहीं देश आहेत. त्यांमध्यें पाऊस फारच थोडा पडतो, त्यामुळें ह्यांत जमीन अगदीं रूक्ष म्हणजे कोरडी असते. कांहीं ठिकाणीं जमीन खडकाळ असते, तर कांहीं ठिकाणीं लांबच्या लांब अफाट माळ असतात, आणि कांहीं ठिकाणीं जंगीं वाळवंटें असतात. ह्या प्रदेशांत नद्या राहूंद्या, पण ओढेही बहुतेक नसतात; आणि विहिरी अतिशय खोल खणल्यावांचून पाणी मुळींच लागत नाहीं. अशा प्रदेशांना बिनपाण्याचे ह्या अर्थाचें निर्जल ( निर्=बाहेर ( गेलेलें ); जल=पाणी ) प्रदेश हें किंवा त्यांत कांहीं ठिकाणीं वाळू फार असते म्हणून वाळवंट हें नांव देतात.

अशांपैकीं तुर्कस्तानांतील टाकला मकान नांवाच्या एका प्रदेशांतून डॉक्टर हेडिन नांवाच्या प्रवाशानें प्रवास केला त्या वेळीं त्याचे व त्याच्या बरोबरच्या लोकांचे किती हाल झाले, यावरून ह्या प्रदेशाची थोडी कल्पना तुम्हांस येईल.

डॉ० हेडिन लिहितात " १८९५ च्या एप्रिलच्या प्रारंभीं आम्ही यार्कंददर्या नदीला पोहोचलों, व त्या नदीच्या पूर्वतीरावर अस-

णाऱ्या मर्केट या गांवीं मुक्काम केला. तेथून टाकला-मकान वाळवंटांतून खोतानदर्या नदीपर्यंत जाण्याचा माझा बेत होता. हा मार्ग सुमारें १८० मैलांचा होता. आमच्या तांड्यांत आठ उंट व चार नोकर होते. बरोबर दोन महिन्यांची शिधा-सामग्री व २९ दिवस पुरण्याइतकें पाणी घेतलें होतें.

आम्ही एप्रिलच्या १० तारखेस मर्केटहून निघालों. माझा उंट अहमदशहानें धरला होता व कासीम सर्वांच्यामागून चालला होता. माझा विश्वासू नोकर इस्लाम बे याच्याकडे सर्वांवर देखरेख कर-ण्याचें काम होतें. बरोबर दोन कुत्रे, तीन मेंढ्या, दहा कोंबड्या, एक कोंबडा..... इतके प्राणी घेतले होते.

आरंभीं कांहीं दिवस सर्व कांहीं ठीक चाललें होतें. रात्रीं मुक्कामाचे ठिकाणीं वाळवंटांत थोडेंसें खणल्यानें उंटांना पुरेसें पाणी मिळे. ह्यामुळें बरोबरच्या डब्यांतील पाणी खर्च झालें नाहीं. पण पुढें पुढें वाळूचा थर जास्त जाड होत गेल्यामुळें पाणी मिळणें कठीण पडूं लागलें. म्हणून आम्ही जरा ईशान्येकडे वळलों.

२३ वे तारखेपासून वाटेनें झाडझुडूप दिसण्याचें बंद झालें. क्वचित् एकादें झाडमात्र दृष्टीस पडे. वाळूच्या टेकड्याही एकी-हून एक मोठी अशा वाटेनें लागूं लागल्या.

दुसऱ्या दिवशीं मोठें वादळ झालें. आमच्या नाकातोंडांत खूप वाळू गेली. त्या दिवशीं फक्त ८ मैल प्रवास सबंध दिवसांत झाला. आतां त्या निर्जल प्रदेशांत झाड किंवा चिटपांखरूं दिसेनासें झालें. वाऱ्याबरोबर येणाऱ्या वाळूंत एकादें झाडाचें पानही दृष्टीस पडेना; व रात्रीं मेणबत्तीच्या दिव्याभोंवतीं एकादें फुलपांखरूंही येईना.

२९ व्या तारखेस एक गोष्ट नजरेस आली ती पाहून मी भिऊन गेलों. बरोबरच्या पाण्याच्या हौदांपैकीं दोन अगदीं रिकामे झाले व

बाकीच्या दोहोंमध्यें फक्त दोन दिवसांस पुरेल एवढें पाणी राहिलें. पाण्याची अफरातफर होऊं नये म्हणून मीं ते इस्लाम बेच्या ताब्यांत दिले. यापुढें पाण्याची राखण सोन्याप्रमाणें ठेविली होती व तें रोज बेतानें देण्यांत येत असे.

२६ व्या तारखेस पाणी मोजून पाहिलें तों, प्रत्येकास दोन दोन लहान पेले याप्रमाणें तीन दिवस पुरेल एवढें पाणी आमच्याजवळ राहिलें होतें. दुसऱ्या दिवशीं पश्चिमेकडे ढग दिसूं लागले. ते पाहून आम्हांस वाटलें कीं, ईश्वरास आमची दया आली आहे. ढग मोठमोठे झाले व जवळ ( डोक्यावर ) आले. आम्हीं पाण्याचीं भांडीं बाहेर काढलीं व तंबूवरून गळणारें पाणी सांचवितां यावें म्हणून तंबू उभारून पावसाची वाट पाहात बसलों; पण आमची पूर्ण निराशा झाली. ढग आले तसे गेले व आम्हांस पाण्याचा एक थेंबही मिळाला नाहा !

उंट तहानेनें अगदीं थकून गेले होते म्हणून त्या दिवशीं आम्हांला कांहीं उंट वाटेंत सोडून देणें भाग पडलें, व त्यांबरोबर चूल, गालिचा, बिछाना, डबे....इत्यादि सामान वाटेंत टाकून द्यावें लागलें.

२८ व्या तारखेस सकाळीं ईशान्येकडून प्रचंड वादळ आलें. ह्या वादळानें वाळू इतकी उडते कीं दिवसां रात्रीसारखा काळोख पडतो. आमच्या तंबूवर वाळूचा वर्षाव झाला. वाळूनें जीव अगदीं गुदमरून गेला. वाऱ्याच्या उलट दिशेस तोंडें करून उंट पडले व वाळूनें जीव गुदमरूं नये म्हणून आम्हींही उंटाखालीं आपलीं तोंडें घातलीं..... त्या दिवशीच्या वादळांत एक उंट हरवला.

३० व्या तारखेस सकाळीं पाण्याच्या भांड्यांत सुमारें दीड पावशेर पाणी राहिल्याचें दिसून आलें. पुढें उंट लादण्याच गड-

वडींत लोक असतांना आमचा वाटाड्या पाण्याच्या भांड्यास तोंड लावतांना इस्लामला आढळला. लागलींच इस्लाम त्याच्या अंगावर धावला व त्यास त्यानें जमिनीवर लोळवलें. इस्लाम त्याला ठार मारणार तों मीं त्याला प्रतिबंध केला. भांड्यांत फक्त तीन छटाक पाणी राहिलें होतें. दोन प्रहरीं पाण्यांत रुमालाचें शेवट भिजवून त्यानें बरोबरच्या माणसांचे ओठ मीं ओले केले. संध्याकाळीं पाणी वांटण्याची वेळ आली तेव्हां पाहातों तों भांडें अगदीं कोरडें ठणठणीत ! कासीम व महमद यांनीं मध्यंतरीं पाण्यावर ताव मारला होता, असें दिसतें. झालें; बरोबरचें पाणी संपलें !

मेच्या पहिल्या तारखेस सकाळीं उंटासाठीं बरोबर घेतलेल्या तेलापैकीं कांहीं तेल पिऊन लोकांनीं तहान भागविली. आदल्या दिवशीं मला पाणी मुळींच मिळालें नव्हतें म्हणून मला फार तहान लागली होती. तहानेच्या वेदना फारच भयंकर असतात. तहानेनें मनुष्य थकून जातो एवढेंच नव्हे तर अगदीं वेडा होऊन जातो. आमच्याजवळ स्पिरिटचें (दारूच्या अर्कांचें) एक पींप होतें व ती स्पिरिट स्टोव्ह(=चूल)साठीं आम्हीं ठेविली होती. पण अंगाची तहानेनें आग होत होती म्हणून मी एक ग्लासभर स्पिरिट प्यालों व ती पिण्याचा मोह फिरून पडूं नये म्हणून बाकीची स्पिरिट ओतून टाकली.

स्पिरिटमुळें माझी शक्ति अगदीं क्षीण झाली. मला इतरांच्या बरोबर चालवेना म्हणून मी मागें राहूं लागलों. मला उंटांच्या घंटांचा आवाज ऐकूं येई, पण भोंवतीं वाळूशिवाय दुसरा कसलाही पदार्थ दिसेना !

शेवटीं तांड्यांच्या पावलांवरून वाट काढीत मी एका वाळूच्या टेकडीच्या कड्याजवळ आलों.तों सर्व उंट खालीं बसलेले आंढळले. महमदशहा गुडघे टेकून अल्लाची करुणा भाकीत होता.

कासीम दोन्ही हात तोंडावर ठेवून रडत होता व मधून मधून वायु झालेल्या माणसासारखें हांसत होता. इस्लाम पुढें चालला होता तो परतला आणि म्हणाला, जेथें खणलें असतां पाणी लागेल अशी जागा आपण शोधून काढूं या. " बरें " म्हणून मी पांढऱ्या उंटावर चढलों. त्याच्यावरचें सामान—दारुगोळ्याच्या पेट्या वगैरे—खालीं काढून टाकलें; पण तो उंट हलेना. तेव्हां तेथेंच आम्हीं मुक्काम केला. दोन प्रहरीं आम्हीं कोंबडा मारला आणि त्याचें रक्त प्यालों. इस्लामनें मेंढराचें तोंड मक्केकडे करून त्याचें डोकें छाटलें, व एका भांड्यांत त्याचें रक्त धरलें. पण तें इतकें साकळलें व त्याची इतकी घाण येऊं लागली कीं, कुणाही त्यास तोंड लावीना.

पुढें जाणें शक्य नाहीं असें पाहून आम्हीं बरोबरचें सामान तपासलें, व अगदीं आवश्यक सामानाशिवाय बाकीचें सर्व सामान तेथेंच टाकून पुढें कूच करण्याचा बेत केला. आमचा वाटाड्या ताहानेनें अगदीं वेडा होऊन गेला होता. बिचाऱ्यानें वाळू पाणी आहे असें समजून ती तोंडांत भरली! तो व महमदशहा हे जगत नाहींत असें आम्हांस दिसून आलें, म्हणून आम्ही त्यांनाही तेथेंच सोडून निघालों.

बरोबरचीं माणसें मागें राहिलीं म्हणून त्या दिवशीची रात्र आम्हांला फारच भयाण वाटली. आम्ही दोघे वेड्यांसारखे वाळूंतून चाललों होतों. आम्ही कोणीकडे जात आहोंत हें कांहींच समजेना. म्हणन मी उंटावरून उतरलों, दिवा लावला, व पुढें जाऊन वाट कोठें चांगली आहे तें पाहूं लागलों. इतक्यांत इस्लाम झोके खात माझ्याजवळ आला व हळूच म्हणाला " माझ्याच्यानें पुढें पाऊल टाकवत नाहीं. " मीं त्याला धीर दिला, ' विश्रांति घेऊन बरो-

बरचें सर्व सामान टाकून देऊन माझ्या पावलांच्या मागानें ये' म्हणून मीं त्याला सांगितलें, व त्याचा निरोप घेऊन पुढें निघण्याचें ठरविलें. त्या वेळीं उंट माना लांब पसरून अर्धवट मेल्यासारखे पडले होते. अर्थात् त्यांना सोडून देणें भाग पडलें. माझ्याबरोबर येण्याच्या स्थितींत फक्त कासीम होता. त्यानें बरोबर एक खोरें, एक बादली, व एक कातड्याची पिशवी घेतली. माझ्याबरोबर माझें घड्याळ, होकायंत्र, चाकू, टांक, कागदाचे तुकडे, लॉबस्टर माशांचे व चाकोलेटचे दोन लहान डबे, एक लहान पेटी, कांहीं आगकाड्या व दहा विड्या एवढेंच सामान होतें. बरोबरच्या अन्नाचा कांहींच उपयोग झाला नाहीं. कारण तोंड, जीभ व घसा हीं तहानेनें कोरडीं पडल्यामुळें कसलेंही अन्न गिळणें अशक्य होतें.

आम्हीं आंगांत कपडे फार थोडे ठेवले होते. शेवटच्या मुक्कामावरून निघतांना मीं पेटींतून नवे कपडे काढून घातले होते; कां कीं, मरण आलेंच तर अंगावर धड कपडा असावा.

निराशेनें जिवावर उदार होऊन आम्ही चाललों. दोन तास चालल्यावर आम्हांस झोंपेनें इतकें घेरलें कीं, आम्ही वाटेंतच झोंपलों. पहाटे ४ वाजतां जागे झालों व प्रवास चालू केला.

मधून मधून विश्रांति घेत आम्ही बारा वाजेपर्यंत चाललों. दोन प्रहरच्या उष्णतेनें व चालण्यानें आम्ही अगदीं थकून गेलों. विश्रांति घेण्याकरितां आम्हीं एका वाळूच्या टेकडीच्या उतरणीवरील सावलीच्या भागांत थंड वाळू खणून त्या खड्ड्यांत, आंगावरील सर्व कपडे काढून, आपलें शरीर ( डोक्याशिवाय ) पुरून घेतलें. उन्हाच्या झळयांचा त्रास होऊं नये म्हणून वाळूंत खोरें पुरून त्याच्या दांड्यावर आम्हीं आपले कपडे घालून त्याचा आड पडदा केला होता.

सायंकाळीं सहा वाजतां आम्हीं आपला प्रवास पुन्हां चालू केला. आमची शक्ति क्षीण होत चालली होती. विश्रांतीकरितां मधून मधून आम्ही थांबत होतों. रात्रीं एक वाजतां वाळूच्या टेकडीवर आम्ही झोंपीं गेलों.

मे महिन्याची तिसरी तारीख उजाडली; मीं हातांत होकायंत्र धरून प्रवास सुरू केला. वाटेंत कासीम थांबला व माझ्या खांद्यावर हात ठेवून त्यानें पूर्वेकडे बोट केलें; पण त्याच्या तोंडांतून शब्द निघेना. पूर्वेकडे दूर अंतरावर एक लहानसा ठिपका दिसत होता. तें हिरवें झाड असावें व त्याच्या मुळाशीं पाणी असलें पाहिजे; एरव्हीं तें त्या वालुकामय समुद्रांत दृष्टीस पडलें नसतें अशी आमची समजूत झाली. झाडाजवळ गेलों तेव्हां ईश्वराचे आभार मानले. जिवंत राहण्याची आतां आम्हांला आशा वाटूं लागली. एखाद्या जनावराप्रमाणें आम्हीं त्या झाडाचे कोंवळे शेंडे चघळले. थोडा वेळ झाडाच्या सावलींत विश्रांति घेऊन आम्ही निघालों व ९॥ वाजेपर्यंत चालत राहिलों. थकल्यामुळें वाटेंत एक वाळूची टेकडी लागली तेथें आम्ही थांबलों. आम्हीं आंगांतले सर्व कपडे काढले, आणि पूर्वीप्रमाणें आपणांस वाळूंत पुरून घेतलें. एक शब्दही न बोलतां तेथें ९ तास विश्रांति घेतली. संध्याकाळीं आम्हीं प्रवास सुरू केला. वाटेनें आम्हांस तीन सुंदर सफेत्याचीं झाडें लागलीं. त्यांचीं पानें कडू होतीं म्हणून तीं आम्हांस खाववेनात; पण तीं आम्हीं आंगावर चोळलीं, त्यामुळें कातडीला थोडासा ओलावा मिळाला.

येथें पाणी लागेल म्हणून झरा खणण्याचा आम्हीं यत्न केला. पण हातांत शक्ति न राहिल्यामुळें हातांतून खोरें भराभर पडूं लागलें. मग आम्ही खालीं निजलों व हातानें वाळू उकरूं लागलों, पण कांहीं जमेना.

मेच्या चवथ्या तारखेला पहाटे ४ वाजतां आम्ही निघालों. ९ तास चालल्यावर आम्ही फार थकून गेलों, आणि वाळूवर आंग टाकलें. खळगा खणण्याचें कासीमला सामर्थ्य राहिलें नाहीं. मीं मात्र पूर्वीप्रमाणें वाळूंत पुरून घेतलें. मी तशा स्थितींत १० तास होतों पण पापणीस पापणी बिलकूल लागली नाहीं.

संध्याकाळ झाली व फिरून प्रवास करण्याची मी तयारी करूं लागलों. कासीम हळूच उद्गारला 'आतां माझ्याच्यानें एक पाऊलही पुढें टाकवत नाहीं.' त्याचा निरोप घेण्याचेंही त्या वेळीं मला सुचलें नाहीं. मी लागलींच चालूं लागलों. पुढें मध्य रात्रीचे सुमारास थकवा येऊन मी एका झाडाजवळ पडलों. सर्वत्र सामसूम होती. आकाशांत चांदण्या चमकत होत्या. माझ्या काळजाचें धडधडणें व घड्याळाचें टिकटिकणें यांवांचून दुसरा कसलाही आवाज ऐकूं येत नव्हता. इतक्यांत वाळूंतून एक आवाज ऐकूं आला. 'कोण कासीम काय ?' असें मीं विचारिलें, तों 'होय महाराज' असें उत्तर आलें. 'आणखी जरासे पुढें जाऊं या' असें मीं म्हणालों आणि तो माझ्या मागोमाग येऊं लागला. त्याचे पाय त्या वेळीं लटलटां कांपत होते.

आम्हांला या वेळीं तहानेचा तितका त्रास होत नव्हता. कारण आमचें शरीर चमड्याप्रमाणें शुष्क होऊन गेलें होतें व स्पर्शज्ञान नाहींसें झालें होतें; पण आमची शक्ति पूर्ण नाहींशी झालीसें दिसलें. चालवेना म्हणून आम्ही रांगत कांहीं अंतर गेलों. आमचें भान नाहींसें झाल्यासारखें झालें होतें व आम्ही जणू काय झोंपेंत चाललों होतों असें वाटत होतें !

लागलींच आम्ही एकदम शुद्धीवर आलों. आम्हांस आमच्या माणसांची पाऊलवाट दिसली व ती पाहून आम्ही आश्चर्यचकित

होऊन गेलों. पावलांच्या मार्गानें आम्ही चाललों तों एका वाळूच्या टेकडीवर गेलों. तेथें पावलें फार स्पष्ट दिसत होतीं. तीं पाहून कासीम निराशेच्या स्वरानें ' हीं आपलीं स्वतःचींच पावलें आहेत ' असें उद्गारला. आम्ही बेशुद्धींत चालतांना चक्कर घेऊन मूळच्या ठिकाणीं आलों होतों ! तें पाहून आमचें धैर्य खचलें व खिन्न होऊन आम्हीं तेथेंच आंग टाकलें !

ती मेची पांचवी तारीख होती. आम्ही कांहीं वेळ झोंपीं गेलों व जागे झालों तों पहाटेचे चार वाजले होतें. कासीमला भयंकर आजार झाल्याचें दिसत होतें. त्याची जीभ पांढरी शुष्क होऊन सुजली होती व ओठ काळे पडले होते, त्यास भयंकर उचकी लागली होती. रक्त अगदीं थिजल्यासारखें झालें होतें, व सर्व चिन्हें मृत्यूचीं दिसत होतीं..................................


..................................................................

सूर्योदय झाल्यावर पूर्वेकडे क्षितिजावर एक काळी रेषा दिसली. ती खोतान नदीच्या तीरावराची झाडी असावी असें मनांत येऊन फार आनंद झाला.

मध्यंतरीं एका ठिकाणीं सफेत्याचीं झाडें लागलीं. तेथें पाणी लागेल म्हणून खणण्याचा यत्न केला पण पूर्वींप्रमाणेंच खोरें हातांतून निसटूं लागलें. मग तसेंच धडपडत पुढें गेलों.

शेवटीं आम्ही झाडीजवळ जाऊन पोहोंचलों. ती झाडी पाहून एकाद्या भयंकर स्वप्नांतून जागे झाल्यासारखें आम्हांस वाटलें. आमच्यापुढें ती हिरवी झाडी पाहून मन अत्यानंदानें भरून गेलें !

आतां नदी जवळच असली पाहिजे असें आम्हांस समजून आलें. आम्ही त्या झाडींतून चालूं लागलों तों मध्यंतरीं एक पाऊलवाट आढळली. सुमारें नऊ वाजलें होतें, पण आम्ही इतकें थकलों होतों कीं,



निर्जल प्रदेशांतील वाळवंट.

नदी लौकरच सांपडेल ह्या आशेनेंही अंगांत तकवा येईना. शेवटीं कांहीं सफेत्यांच्या सावलींत जाऊन आम्हीं आंग टाकलें. कासीम तर बहुतेक बेशुद्ध झाला होता. त्यास धाप लागली होती व डोळे पांढरे झाले होते. मीं त्याला हालविलें तरी कांहीं हूं कीं चूं करीना.

मी अंगांतले कपडे काढून झाडांच्या मुळ्यांमधील एका खबदाडींत जाऊन पडलों. ह्या झाडाच्या मुळांशीं विंचू असतात व त्यांच्या खुणा तेथें दिसत होत्या. परंतु त्यांनीं त्या वेळीं मजवर मेहेरबानगी केली.

तेथें मी दहा तास पडून राहिलों. संध्याकाळीं सात वाजल्यावर खोऱ्याचा दांडा हातांत टेकण्यास घेऊन निघालों. कासीम प्रेतवत्

झाला होता म्हणून त्यास तेथें टाकून पुढें जाणें भाग पडलें. वाटेनें, पडलेल्या झाडांच्या खोडांवर पडून मी विश्रांति घेत होतों. चार पावलें चालावें व मध्येंच पडून विश्रांति घ्यावी असा क्रम चालला होता. कांटेरी झाडांतून जातांना माझे कपडे फाटत व आंग ओरखडे. शेवटीं अंधार पडला व मला झोंपेनें घेरलें. ती झोंप मला अंतकाळच्या झोंपेसारखी वाटली. त्या वेळीं मी निजलों असतों तर तेथेंच राम म्हणावा लागला असता हा विचार मनांत येऊन मीं ती झोंप निवारण्याचा शिकस्तीचा यत्न केला..................

..........................................................................

जंगल संपलें व नदीचें तास दृष्टीस पडलें, पण तें अगदीं कोरडें होतें. तास सवा मैल रुंद होतें. काय होईल तें होवो, सर्व तास ओलांडून जावयाचें असा मीं निश्चय केला व खोऱ्याचा दांडा टेकीत टेकीत चालूं लागलों.

त्या वेळीं थोडें चांदणें पडलें होतें. तासाच्या मध्यापर्यंत गेलों तरी पाणी दिसेना ! पूर्व तीरावरील झाडी पाहिली तों ती पूर्वी दिसत होती त्यापेक्षां दूर दिसूं लागली. झालें, सर्व अवसान खचलें. नदीच्या तासाच्या मध्यभागीं तहानेनें मरणार असें आतां मला वाटूं लागलें. शेवटीं, अखेरची मजल मारण्याचा निश्चय करून मी मोठ्या कष्टानें उठलों व चालूं लागलों. थोडासा गेलों तों एकदम थांबलों. कारण, एक बदक एकदम उडतांना दिसलें व पाणी उडाल्याचा आवाजही ऐकूं आला ! चार पावलें त्या दिशेनें गेलों तों पाण्याचें डबकें दृष्टीस पडलें !!!

लागलींच मीं गुडघे टेकले व मृत्यूच्या जबड्यांतून सुटका केल्याबद्दल ईश्वराची प्रार्थना केली. नंतर खिशांतलें घड्याळ काढून नाडी

पाहिली तों तिचे ठोके एका मिनिटास ४९† भरले. मग पाणी पिण्यास आरंभ केला. प्रथम सावकाश सावकाश पाणी प्यालों व नंतर सडकून प्याला. मनाचें पूर्ण समाधान होईपर्यंत मी पाणी पीपी प्यालों. नंतर थोडी विश्रांति घेतली, तेव्हां अंगांत हुषारी आली. थोड्या वेळांत नाडीचे ठोके मिनिटास ५६† पर्यंत पडूं लागले. माझे हात सुकून लाकडाप्रमाणें कठीण होऊन गेले होते ते किंचित् मऊ पडले, शरीरांत रक्त खेळूं लागल्यासारखं वाटलें व कपाळास किंचित् ओलावा आला. त्या वेळेला जो आराम वाटला त्याचें वर्णन काय करावें !

आतां भुकेच्या असह्य वेदना होऊं लागल्या म्हणून जवळच गवत, फलें व बोरूंचे शेंडे खाल्ले; पण भूक शांत होईना. शेवटीं त्या डबक्यांतील बेटकुळ्या खाण्याचा यत्न केला. त्या कडू लागूं लागल्या, म्हणून त्यांची मान मुरगळून त्या सबंध गिळून टाकल्या !"

डॉ. हेडिन यांची पुढील हकीकत थोडक्यांत अशी आहे:—

भूक शांत होऊन हुषारी आल्यावर त्यांनीं पायांतील बूट काढून ते पाण्यानें भरले व कासीमला शोधून काढून त्यास पाणी पाजलें. मागून येणाऱ्या कांहीं प्रवाशांनीं इस्लामला अन्नपाणी दिलें यामुळें कासिम व इस्लाम हे जगले. बाकीचे नौकर व उंट त्या वाळवंटांत स्वर्गी गेले.

---

† मोठ्या माणसाच्या नाडीचे ठोके सामान्यतः मिनिटास ७०–८० पडतात. म्हातारपणीं ठोके दर मिनिटास ७० ते ६० पडतात. फार अशक्तता आली असतां ठोक्यांची संख्या कमी होत जाते.

# अरबस्तान.

आतां आपण अरबस्तान हा देश पाहूं. जगांत प्रसिद्ध असलेल्या अशा घोड्यांचा हा देश आहे. ह्या घोड्यांसारखे गुणी घोडे जगांत दुसरे नाहींत. घोड्यांवर अरब लोक घरांतील माणसांप्रमाणें ममता करतात. शिंगरें घरांत मुलांप्रमाणें मोकळीं हिंडतात.



निर्जल प्रदेश—ह्या देशांत निर्जळ प्रदेश अथवा वाळवंटें बरींच आहेत. या निर्जळ प्रदेशांतुन प्रवास करणें फार त्रासाचें असतें हें तुम्हांस कळून आलेंच आहे. या वाळवंटाच्या प्रदेशांत कधीं कधीं फार भयंकर वादळें होतात व त्यांपासून प्रवाशांना फार त्रास होतो.

एका प्रवाशानें केलेलें वादळाचें वर्णन—" वादळाचीं चिन्हें दिसतांच आम्ही चिंतातुर होऊन आमच्या तंबूकडे पाहूं लागलों. वारा जास्त कढत व जास्त जोराचा होत चालला. दशदिशा धुळीनें धुंद होऊन गेल्या व एकाद्या प्रचंड भट्टींतून आलेल्या वाफाऱ्याप्रमाणें जीव गुदमरून टाकणारा कढत झंझावात वाहूं लागला. आमचे उंट माना खालीं घालून बसण्याची तयारी करूं लागले. आम्ही त्यांना तसेच हाकीत होतों, परंतु धुळीनें अंधार इतका झाला होता, व वारा इतका कढत वाहूं लागला होता कीं, उंट अगदीं व्याकूळ होऊन गेले. लवकरच आम्हीं तंबू गांठला. वादळ जेव्हां खूप जोरांत आलें तेव्हां आम्ही तोंडें गुरफटून स्वस्थ पडलों. आमचा जीव गुदमरला होता, परंतु तोंडावरचें पांघरूण काढलें असतें तर नाकांत उष्ण वारा व वाळू शिरून प्राणांतच झाला असता. आमचे उंट तंबूबाहेर जमिनीवर माना पसरून प्रेतवत् पडले होते. अशा स्थितींत सुमारें १० मिनिटें होतों. तेवढा वेळ आम्हांस असें वाटत होतें कीं, जणू काय आमच्या आंगावरून, थोड्या अंतरावरून, लाल तापविलेली लोखंडाची कांब कोणी तरी नेत आहे."

उंट—असल्या प्रदेशांतून प्रवास करण्यास उंट जनावर फार उपयोगीं पडतें. हा प्राणी ईश्वरानें अशा देशांसाठींच उत्पन्न केला आहे असें वाटतें. याची मान लांब असते त्यामुळें गवत न मिळेल तेव्हां उंच झाडांचीं पानें त्यास खातां येतात. त्याचें तोंड बळकट असतें यामुळें त्यास कांटेरीं झाडेंही खातां येतात. त्यास आपल्या नाकपुड्या झाकतां येतात म्हणून उष्ण वाळू व वारा यांपासून त्याला आपलें रक्षण करतां येतें. त्याचे गुडघ्याला मऊ गादी असते म्हणून त्यास वाळूंत गुडघे टेकतां येतात. उंटाचीं पावलें रुंद असल्यानें तीं

वाळवंटांत रुतत नाहींत. तो एकदां पाणी प्याला म्हणजे १।२ दिवस नव्हे तर कित्येक दिवस त्यास पाणी प्यावयास मिळालें नाहीं तरी चालतें. म्हणून वाळवंटांतून प्रवास करण्यास उंट फार उपयोगीं पडतात.

उंटाचें दूध, केंस, मांस, कातडें व सर्व कांहीं मनुष्यांना उपयोगीं पडतें. याप्रमाणें या प्रदेशांत उंट हा अतिशय उपयोगी प्राणी आहे. त्यास अरबांची कामधेनु म्हटलें तरी चालेल. जहाजांवांचून समुद्रांतून जाणें जसें अशक्य, त्याप्रमाणें उंटांवांचून वाळवंटांतून जाणें अशक्य. म्हणून उंटास ' वाळवंटरूपी समुद्रांतून जाण्याचें जहाज ' असें नांव दिलें आहे.

**अरबांची राहणी वगैरे**—निर्जल प्रदेशामुळें अरबस्तानांत शेतें करून लोकांना पोट भरतां येत नाहीं. निर्जल प्रदेशांत जें थोडें गवत उगवतें त्यावर घोडे, उंट, मेंढरें यांचा निर्वाह होतो; पण एका ठिकाणीं गवत थोडें व विरळ असतें म्हणून जनावरें बरोबर घेऊन अरबांना लांब हिंडत जावें लागतें. या कारणानें बरेच अरब एका ठिकाणीं न राहतां हिंडत असतात. हे हिंडणारे अरब तंबूंतून राहतात. ह्या तंबूंचें कापड व दोऱ्या हीं उंटांच्या केसांचीं केलेलीं असतात.

अरबांचें मुख्य खाणें खजूर व खारका. खारकांचें झाड नारळ झाडासारखें असतें. ह्या देशांत उत्कृष्ट खारका होतात व खारकांचीं झाडें सर्वत्र उगवतात. खारकांपासून खजूर होतो. खारका व खजूर हीं अरबस्तानांत इतकीं होतात कीं, हे जिन्नस एकाद्या देशांत नसतील अशी अरबांना कल्पनाही होत नाहीं. एकदां एका परदेशी माणसाशीं बोलतांना एका अरबानें ऐकलें कीं, त्या देशांत खजुराचीं झाडें नाहींत. लागलींच तो आश्चर्यचकित होऊन म्हणाला

" काय ! खजुराचीं झाडें नाहींत ! मग लोक खातात तरी काय, आणि जगतात तरी कसे ? "

ते मेंढ्या व उंट यांचें मांस खातात. ते उंटाच्या दुधाचाही उपयोग करतात. अरबस्तानांत विस्तीर्ण वाळवंटें आहेत, तरी तेथें टोळांचा उपद्रव आहेच. पण अरब लोक टोळांचा चांगलाच समाचार घेतात. तेथें टोळांना भक्ष्य मिळण्याऐवजीं तेच लोकांचें भक्ष्य होतात. सकाळीं टोळांच्या पंखावर दहिंवर पडून त्यांचे पंख लुले होतात. त्यामुळें किंवा त्यांना मारण्यासाठीं जंगल पेटवून केलेल्या धुरामुळें ते मृतप्राय होऊन त्यांचा जमिनीवर सडा पडतो. मग त्यांवर घोडे उंट वगैरे चरतात. एवढेंच नव्हे तर लोक ते गोळा करून त्यांचा भाजीच्या किंवा भाकरीचे पिठांत मिसळण्याच्या कामीं उपयोग करतात. समुद्रांतील झिंग्या जातीचे लहान लहान प्राणी इकडे बाजारांत विकतात, त्याप्रमाणें वाळविलेल्या टोळांच्या पाट्यांच्या पाट्या तिकडे बाजारांत विकण्यास येतात. टोळांचा मेवा खाल्लेल्या एका युरोपियन बाईनें लिहिलें आहे कीं, त्यांची चव गव्हाच्या ओंब्याप्रमाणें कांहीं अंशीं लागते !

अरब लोकांना मुलगा झालेला फार आवडतो. मुलगी होणें हें ते दुर्दैव समजतात. मुलगी झाली तर लोक बापास म्हणतात ' तिच्यापासून तुम्हांस शक्य तितकें सुख लाभो. ' बाप उत्तर करतो ' आमचें दुर्दैव आहे खरें.' मुलगा झाला तर मात्र सर्वांना आनंद होतो. लोक म्हणतात ' अल्लानें तुम्हांवर मेहरनजर केली आहे. ' बापास मुलांची संख्या विचारली तर तो मुलग्यांची संख्या सांगतो; जणू काय मुली मुलेंच नव्हत.

शौर्य व आदरातिथ्य यांविषयीं अरब लोकांची ख्याति आहे. शत्रूही तंबूत आला तर त्यास ते एकाद्या पाहुण्याप्रमाणें वागवितात.

# इंग्लंड.

इंग्लिशांचा देश इंग्लंड हा होय हें तुम्हांस माहीत आहे. इंग्लिश लोकांची राहाणी आपल्याहून अगदीं निराळी आहे. आपल्या इकडे पुष्कळ माणसें बहुतेक उघडीं, तर तिकडे सर्व माणसांचें आंग नेहमीं कपड्यांनीं झाकलेलें. आपल्या इकडे कोणाच्या घरीं गेल्यावर आपण जोडे काढतों, तर तिकडे दुसऱ्याच्या घरीं गेल्यावर प्रथम टोपी काढतात. इकडे घरांचीं दारें व खिडक्या बहुतेक उघड्या, तर तिकडे बहुतेक बंद. याप्रमाणें इंग्लंड व आपला देश यांत बऱ्याच बाबतींत फरक आहे.

जेवणखाण—तिकडे बायका व पुरुष एकदम जेवावयास बसतात. सर्व पदार्थ ताटांत एकदम न मांडतां एकेक पदार्थ एकेका बशींत घालून प्रत्येकापुढें ठेवतात. तोंडीं लावणीं अनेक प्रकारचीं घेण्याची त्यांच्यांत चाल नाहीं. पानाजवळ मीठ, मिरपूड, व्हिनेगर ( द्राक्ष अथवा दुसरे पदार्थ यांपासून केलेला आंबट पदार्थ; यास इकडे शिरका म्हणतात ) यांच्या बाटल्या ठेवलेल्या असतात. त्यांतील वाटेल तेवढा पदार्थ खाणारानें घ्यावा. भातभाकरीबरोबर भाज्या तोंडीं लावण्यास न घेतां त्या निराळ्या व नुसत्या खातात.

जेवतांना खाण्याचे पदार्थ हातानें न घेतां चमच्यानें व काट्यानें घेतात. जेवतांना भुरका मारून भुर्र् असा आवाज करणें, जेवणावर किंवा केव्हांही ढेकर देणें हें असभ्य मानलें जातें.

त्यांच्या खाण्याच्या वेळाही आपल्याहून निराळ्या असतात त्या येणेंप्रमाणें:—

सकाळीं ८–९ वाजतां न्याहारी;

दोनप्रहरीं १–२ वाजतां लहान जेवण;

तिसऱ्या प्रहरीं ४–५ वाजतां फराळ व चहा;

संध्याकाळीं ७–८ वाजतां मुख्य जेवण.

रात्रीं ९–१० वाजतां दूध, बिस्किटें वगैरे खाऊन लहानसा फराळ कोणी कोणी करतात. कधीं कधी मुख्य जेवण दोन प्रहरीं १–२ वाजतां होतें. त्या दिवशीं संध्याकाळचें ७–८ वाजतांचें जेवण नसतें.

या देशांतील थंड हवेमुळें येथें भूक चांगली लागते, म्हणून लोकांना अनेक वेळां खावें लागतें.

आपल्या इकडे बहुतेक लोक फक्त दोनदां जेवून राहातात याचें इंग्लिश लोकांना फार आश्चर्य वाटतें. 'फक्त दोनदां खाऊन लोक जगतात तरी कसे ' असें ते म्हणतात.

आपल्या इकडे भात भाकरी हें मुख्य अन्न; मांस फार थोडे लोक खातात व तेंही थोडेंच खातात. तिकडे मांस हें बहुतेकांचें महत्त्वाचें अन्न. खाण्यांत तिखट बहुतेक नसतें. तसेंच लाडवासारखे फार साखर-तूप घातलेले पदार्थ त्यांच्यांत नसतात.

आपल्या इकडे आपण घरीं बहुतेक जमिनीवर बसतों, पण तिकडे जमिनीवर कोणीही बसत नाहीं. तिकडे मनुष्य कितीही गरीब असो–तो मजूर कां असेना–तो खुर्चीवर बसतो व खाटेवर किंवा पलंगावर निजतो. त्यांचें जेवणखाण टेबलावरच होतें.

**भिन्न गोष्टी**—इतर राहाणीही आपल्याहून फार निराळी आहे. जिकडेतिकडे आगगाडीचे रस्ते आहेत. सर्व शहरांतून ट्रामगाड्या व मोटार गाड्या असतात. शाळा व कॉलेजें अनेक आहेत व त्यांच्या इमारती मोठ्या व सुंदर असतात. तुम्हीं मुंबई पाहिली असेल तर थोडक्यांत असें सांगतां येईल कीं, तेथील बहुतेक ठिकाणें मुंबईसारखीं आहेत. या देशांत गिरण्या, कारखाने व खाणी फार आहेत.

इंग्लंडांत मुलांच्या बाबतींत एक गोष्ट विशेष आहे. ती हीं कीं, घरांत लहान मुलांसाठीं एक स्वतंत्र खोली ठेवलेली असते. त्यांत, त्यांना योग्य अशा लहान खुर्च्या व टेबलें असतात व त्यांचे खेळ ठेवलेले असतात. मुलांनीं आपल्या खोलींत किंवा बागेंत खेळावयाचें. मोठ्या माणसांनीं बोलावल्याशिवाय मुलें त्यांच्या बसण्याच्या जागेंत जात नाहींत.

इंग्लंडमध्यें विकाऊ मालाच्या किंमती ठरलेल्या असतात. त्याबद्दल गिऱ्हाईक व दुकानदार यांमध्यें घासाघीस चाललेली फारकरून दृष्टीस पडत नाहीं. कोणत्याही दुकानांत मालाच्या किंमती, मालास कार्डाप्रमाणें कागदाचा तुकडा लावून त्यावर, मांडलेल्या असतात, अथवा छापील यादींत दिलेल्या असतात. किंमत पटली तर गिऱ्हाइकानें माल घ्यावा; किंमतीबद्दल दुकानदाराशीं घासाघीस करण्याचें कारण नाहीं.

इंग्लंडांतील घोडे फार धिप्पाड असतात. तिकडील गाईंना व बैलांना वशिंड नसते, यामुळें त्यांची पाठ अगदीं सपाट असते. गाई दूध फार देतात. कांहीं गाई वेळेस आठ दहा शेर दूध देतात! तिकडे म्हशी मुळींच नाहींत.



इंग्लिश गाय.

धर्म व सण—या लोकांचा धर्म व त्यांचे सण आपल्याहून

दा. क्र. २१८९

अगदीं निराळे आहेत. त्यांचा धर्म ख्रिस्ती होय हें तुम्हांस माहीत आहेच. त्यांचा मोठा सण नाताळ हा होय. तो डिसेंबरांत येतो. ख्रिस्ती धर्माचा संस्थापक एशू क्रिस्त याचा जन्म डिसेंबरच्या २९व्या तारखेस झाला. नाताळ या शब्दाचा मूळ अर्थ जन्मसंबंधीं; ख्रिस्ताच्या जन्मासंबंधानें हा सण आहे, म्हणून यास हें नांव पडलें आहे. यास क्रिस्तावरून क्रिस्टमस असेंही नांव आहे. या सणांत आपल्या मुलांनाच नव्हे तर नातेवाईक व मित्र यांना देणग्या देण्याची चाल आहे. नाताळ ही ख्रिस्ती लोकांची दिवाळीच होय.

" आपल्याकडे जशी दिवाळीच्या सुमारास साफसुफी करतात, तसेंच तिकडेही करून, ख्रिस्तमस् देणग्यांसाठीं म्हणून नाना तऱ्हेच्या वस्तु दुकानांतून विकावयास ठेवलेल्या असतात. एरवीं रविवारीं बाजार अगदीं बंद असावयाचा; पण डिसेंबर महिन्याच्या प्रत्येक रविवारीं दुकानें उघडीं असतात. या वेळीं मुलांच्या जीवाची धांदल विचारूंच नये ! हें विकत घे तें विकत घे असें करीत तीं आपल्या आईबापांना सारखीं बाजारांतून हिंडवीत असतात. सणाच्या प्रारंभीं झाडाच्या खांद्या अगर उंचसें रोपें घरांतील दिवाणखान्यांत शोभेच्या ठिकाणीं उभारून ठेवण्याची तिकडे चाल आहे. तें घरांत आणून उभें केल्यावर त्यांत कांचेचे गोळे, खोट्या चांदीच्या झिरमिळ्या, मेणबत्त्या, चंद्रज्योतीच्या काड्या वगैरे लावून आरास करतात व पवित्र संध्याकाळीं म्हणजे ख्रिस्तजन्माच्या दिवशीं संध्याकाळीं दिवे लावून ही आरास पाहावयाला घरांतील सर्वजण जमतात. या झाडाला नाताळाचें झाड म्हणतात. मुलांना द्यावयाच्या देणग्या ह्या नाताळच्या झाडांस टांगून ठेवण्याची चाल आहे. "*

---

*प्रोफेसर गुणे यांच्या 'युरोपचा प्रवास' या पुस्तकांतून.

नाताळ हे ऐन थंडीचे दिवस. या दिवसांत गरीब लोकांचे फार हाल होतात म्हणून ज्यांना ऐपत असते ते या सणाच्या दिवशीं गरीब लोकांना अन्नवस्त्र देतात.

**हवामान वगैरे**—इंग्लंडमधील हवामान व ऋतु हीं आपल्याहून निराळीं आहेत. तेथें हिंवाळ्यांत थंडी येथल्यापेक्षां फार असते.

हिंवाळ्यांत सूर्योदय आठ वाजतां होतो व चार वाजले नाहींत तों सूर्य मावळतो. थंडीच्या कडाक्यामुळें झाडांचीं पानें गळून त्यांचे खराटे बनतात. बर्फ पडावयास लागून जमीन बर्फानें आच्छादली जाते. झाडांवर व जमिनींवर भक्ष्य मिळत नाहीं म्हणून पक्षी फारसे दृष्टीस पडत नाहींत.

बर्फ पडलें म्हणजे मुलें बर्फ गोळा करून त्याचे चेंडू करतात व ते एकमेकांस मारून बदाबदीचा खेळ खेळतात. कधीं कधीं कांहीं मुलें बर्फाचा ढीग करून त्याचा शिराळशेटासारखा एक बोवा बनवितात. त्याचे डोक्यांत खडे बसवून त्यांचे नाक डोळे करितात व त्याच्या तोंडांत एक चिलीम देतात.

बर्फामुळें जमीन संगमरवरी फरशीप्रमाणें सपाट व गुळगुळीत होते. तिच्यावरून घसरत जाण्याची फार मौज असते. कांहीं लोक चुकूनही घसरून पडतात. हिंवाळ्यांत एक मौजेचा खेळ म्हणजे बुटास स्केट नांवाच्या लांब पोलादी पट्टया बांधून बर्फावर घसरत पळणें हा होय. ह्या पट्टयांच्या साहाय्यानें मनुष्य भरधांव पळणाऱ्या घोड्याच्या वेगानें जमिनीवरून जाऊं शकतो. त्यांच्या साहाय्यानें लांडग्याच्या तडाक्यांतून सुटून आलेल्या एका रशियनाची गोष्ट सांगतात.

या दिवसांत संध्याकाळीं सुखवस्तु लोक घरांत शेकोट्या पेटवून

वाचीत किंवा गप्पा मारीत आनंदानें काळ घालवितात; परंतु गरीब लोकांचे फार हाल होतात. रानांत थंडीच्या कडाक्यानें किंवा बर्फांत सांपडून माणसें क्वचित् मरतातही.

या दिवसांत धुकें फार पडतें. धुकें इतकें दाट असतें कीं, घरांत दिवसां दिवे लावावे लागतात, व रस्त्यांतून दिवे लाविले तरी जाणाऱ्या मनुष्यांना समोरून येणारें मनुष्य दिसत नाहीं. अशा धुक्यांत माणसें, गाड्या यांच्या टकरी होतातच; पण टकरी होऊं नयेत म्हणून पुष्कळ प्रकारच्या योजना केल्या असूनही समुद्रांत होड्या व आगबोटी यांच्याही टकरी होऊन फार नुकसान होतें.

उन्हाळ्यांत सकाळीं चार वाजतां सूर्य उगवतो व संध्याकाळीं आठ वाजतां मावळतो. आकाशांत ढग नसतील तर रात्रीं ९–१० वाजतांही ( संध्याकाळचा ) उजेड इतका असतो कीं, आंगणांत दिव्याच्या उजेडावांचून पुस्तक वाचतां येतें.

उन्हाळ्यानंतर शरदृतु येतो. या ऋतूंत शेतांतील धान्यांचीं पिकें काढण्याजोगीं झालेलीं असतात, म्हणून त्यांची कापणी व मळणी होते. दिवस लहान होऊं लागतात व उष्णता कमी होऊन थंडी वाढूं लागते. झाडांच्या पानांना तांबडा, पिवळा, सोनेरी रंग येतो. लौकरच झाडांचीं पानें गळून जातात, व त्या तांबड्या, पिवळ्या, सोनेरी पानांचा सडा जमिनीवर पडून जमीन गालिच्या-सारखी सुंदर दिसूं लागते.

इंग्लंडमध्यें पावसाळा म्हणून निराळा ऋतु नाहीं. पाऊस बाराही महिन्यांतून वाटेल तेव्हां पडतो. पावसावांचून पंधरा दिवस बहुधा जात नाहींत. तथापि उन्हाळ्याच्या दिवसांत (जूनजुलै) या महिन्यांत पाऊस थोडा जास्त पडतो. हिंवाळ्यांत पाऊस बर्फाच्या रूपानें पडतो. इंग्लंडांतील पावसाचें वर्णनः—

" आपलेकडे पावसाची झड लागली असतां सर्व दिवसभर ज्याप्रमाणें अंधार पडलेला असतो, त्याप्रमाणें लंडन शहरीं नेहमींच अंधार असून स्वच्छ असा सूर्यप्रकाश दृष्टीस पडण्याचा क्वचित्‌च योग येतो. तेथें पाऊस केव्हां येईल याचा मुळींच नियम नसतो. स्वच्छ ऊन पडलें आहे म्हणून बाहेर निघावें तोंच १५ मिनिटांचे आंत अंधारून येऊन पाऊस पडावयास सुरवात होते. तेथें पाऊस इतका बारीक पडतो कीं, ओव्हरकोटावर ( ओव्हरकोट=नेहमींच्या कोटावरून घालावयाचा मोठा कोट किंवा झगा) काम भागत असल्यानें छत्रि उघडण्याचा प्रसंगच येत नाहीं. त्यामुळें म्हातारीं माणसें व बाय यांशिवाय येथें कोणी छत्री उघडून चालतांना दिसत नाहींत. एकाद्या तरुण मनुष्यानें छत्री उघडून चालणें म्हणजे हिंदुस्तानांत हिंवाळ्याचे दिवसांत, सकाळचे प्रहरीं ऊन लागतें म्हणून छत्री उघडून चालण्यासारखें नाजुकपणाचें व भित्रेपणाचें समजलें जातें. येथें वर्षांतील बहुतेक दिवशीं आभाळ येत असल्यानें एकाद्या दिवशीं स्वच्छ सूर्यप्रकाश पडला असतां येथील लोकांस त्यामुळें आनंद होतो. त्या दिवशीं जिकडे तिकडे सर्व लोक एकमेकांस ' आज दिवस किती चांगला आहे ' असें सांगत असलेले दृष्टीस पडतात. दुकानावर कांहीं माल विकत घ्यावयास जावें तों दुकानदार देखील ' आज चांगला दिवस आहे ' असें म्हणून आपला आनंद दाखवितो. प्रथम प्रथम आम्हांस याचें फार आश्चर्य वाटे. पण पुढें तेथें सूर्यप्रकाश किती दुर्मिळ असतो याचा प्रत्यक्ष अनुभव आल्यानंतर तेथील लोकांस उन्हाबद्दल इतकें कौतुक वाटतें तें योग्य आहे असें वाटावयास लागलें."[1]

---

[1] सरदार मुजुमदारकृत 'युरोपचा प्रवास' या पुस्तकांतून.

**लोकांचे गुण**—इंग्लिशांच्यामध्यें घेण्यासारखे अनेक चांगले गुण आहेत. एरवीं एकमेकांत कितीही भांडणतंटे असले, तरी सर्व देशावर संकट आलें असतां भांडणें बाजूस ठेवून एक होणें हा त्यांच्यामध्यें मोठा गुण आहे. मागें एकदां इंग्लंडमध्यें रोमन-कॅथोलिक अथवा जुन्या मताचे ख्रिस्ती व प्रॉटेस्टंट अथवा नव्या मताचे ख्रिस्ती यांमध्यें मोठा तंटा माजून राहिला होता; इतका कीं, कांहीं विरुद्ध पंथाच्या माणसांस लोकांनीं जिवंत जाळलें. पण स्पेनच्या रोमन कॅथोलिक राजानें इंग्लंड जिंकण्याकरतां व तेथील प्रॉटेस्टंट पंथ बंद पाडण्याकरतां आपलें आरमार पाठविलें, तेव्हां दोन्ही पंथांचे लोक एकत्र झाले; एवढेंच नव्हे तर इंग्लंडची राणी प्रॉटेस्टंट पंथाची असतांना तिनें इंग्लंडच्या आरमावरील मुख्याची जागा एका रोमन कॅथोलिक पंथाच्या मनुष्यास दिली व त्यानेंही आपल्या पंथाचा प्रसार करण्यास मदत करण्यासाठीं आलेल्या परंतु परकीय अशा राजाच्या आरमाराचा मोड केला.

व्यवस्थितपणा व नियमितपणा ह्या गुणांविषयीं इंग्लिश लोक फार प्रसिद्ध आहेत. त्यांचीं सर्व कांहीं कामें घड्याळाप्रमाणें नेमानें चालतात. जेवणाखाणाच्या व कामाच्या वेळा अगदीं ठरलेल्या. आपलयइकडे कोणीही मनुष्य वाटेल तेव्हां मित्राच्या किंवा स्नेहाच्या कडे जातो व यजमान वाटेल तेव्हां पाहुण्यास चहा किंवा फराळाचें देतो; असें इंग्लंडमध्यें नसतें. भेटण्याच्या वेळा सामान्यतः ठरलेल्या असतात, त्या वेळींच माणसें भेटण्याला जातात. खाण्याच्या वेळाही ठरलेल्या आहेत; त्याहून अन्य वेळीं पाहुणा आल्यास यजमान चहा किंवा फराळाचें पुढें करीत नाहीं. मोठा बाजार करणें, धुणीं धुणें, मैत्रिणींना भेटणें हीं कामें करण्याचे बायकांचे

दिवसही ठरलेले असतात. नियमितपणा व व्यवस्थितपणा ह्याविषयीं पुढील वर्णन पाहा:—

" स्टेशनवरील हमालास सकाळीं ७ वाजतां सामान घेऊन जाण्यासाठीं आमचे बिऱ्हाडीं येण्यास सांगून ठेविलें होतें. त्याप्रमाणें सकाळीं ६–४९ पावेतों त्याची वाट पाहिली, पण तो न आल्यानें 'कोण जाणें येतो कीं, नाहीं' अशी शंका वाटून आम्हीं दुसरा मजूर बोलावून आणला. त्याजवळ सामान देऊन आम्ही बाहेर पडलों नाहीं तोंच ७ वाजण्याला २ मिनिटें कमी असतां, पहिल्यानें बोलावून ठेविलेला मजूर येऊन हजर झाला. 'इतक्या उशीरां कां आलास' असें म्हटल्याबरोबर, त्यानें खिशांतून नोटबुक काढून त्यांतून त्यास आदले दिवशींची ७ वाजण्याचीच वेळ सांगितलें असल्याचें आम्हांस दाखविलें. या मजुराचा नियमितपणा व नोटबुकांत वेळ लिहून ठेवण्याची पद्धति पाहून आम्हांस फार आश्चर्य वाटलें.............................................................

"व्यवस्थितपणा—शर्यती संपल्याबरोबर त्या पाहाण्यास जमलेल्या हजारों लोकांची परत जाण्यासाठीं ट्रामजवळ अतोनात गर्दी होऊन गेली. पण हे लोक अशा गर्दीच्या वेळीं सुद्धां किती शिस्तीनें वागतात हें उत्तम रीतीनें पाहाण्यास सांपडलें. सर्व लोकांस एकदम बसण्यास जागा नसल्यानें ट्राममध्यें बसण्यास जाणारे लोक, आपण होऊनच, एकामागें एक असे पलटणीप्रमाणें रस्त्यावर उभे राहिले होते. त्यांपैकी पुढील इसम, आलेल्या ट्राममध्यें बसल्यावर, मागील लोक त्याच अनुक्रमानें पुढें सरत; त्यामुळें धक्काबुक्की मुळींच होत नव्हती. मागून येणारा इसम पुढें न जातां ह्या रांगेच्या मागच्या ओळींत उभा राहात असे. तेथें रस्त्यावर पोलीसचे दोन तीन शिपाई उभे होते, पण त्यांस गर्दीची व्यवस्था

करण्यास मुळींच खटपट करावी लागली नाहीं; ह्या वेळेस अशा गर्दीचे प्रसंगीं हिंदुस्तानांत होणाऱ्या धक्काबुक्कीची आठवण होऊन अशा गर्दीत तेथें १०-२० माणसांस लागल्याशिवाय राहिलें नसतें असें ध्यानांत आलें."*

---

## नॉर्वे.

पूर्वीं आगकाड्यांच्या पेट्या आपल्या देशांत नॉर्वे नांवाच्या देशांतून येत असत. ह्या देशांत देवदाराचीं झाडें फार आहेत. त्यांचा काड्या करण्याच्या कामीं फार उपयोग होतो. हल्लीं आपल्या इकडे आगपेट्यांचे कारखाने निघाले आहेत त्यांना लागणारें लाकूड प्रथम नॉर्वेंतून आणीत असत.

देशाचें स्वरूप, घरें इ०—ह्या देशाचा बहुतेक भाग डोंगराळ आहे. डोंगरांतून प्रवाह नेहमीं वाहात असतात व त्यांचा आवाज नेहमीं कानीं पडत असतो. हा आवाज फक्त हिंवाळ्यांत प्रवाह गोठतात तेव्हां बंद पडतो.

नॉर्वेंतील बरींच घरें डोंगराच्या उतरणीवर असतात. लहान मुलें घराबाहेर खेळतांना उतरणीवरून किंवा कड्यावरून खालीं पडूं नयेत म्हणून त्यांना दोरी बांधून ती खुंट्याला अडकवून ठेवतात. प्रदेश डोंगराळ म्हणून मुलें डोंगरावर चढण्यांत फार पटाईत होतात. घरावर गच्ची असून तीवर माती पसरलेली असते. तींत गवत उगवतें एवढेंच नव्हे तर करवंदाच्या सारखीं कांहीं झुडपेंही लावलेलीं असतात. या ठिकाणीं शेळ्याही बांधलेल्या असतात.

---

*सरदार मुजुमदारकृत 'युरोपचा प्रवास.'

देशांत जंगल पुष्कळ म्हणून घरांच्या भिंतीदेखील लाकडी फळयांच्या केलेल्या असतात. आगगाडीच्या एंजिनांतही लाकडेंच जाळतात. घरें लाकडांचीं म्हणून त्यांना आग लागण्याची फार भीति असते. आग लागली असतां बाहेर पडतां यावें म्हणून वरच्या मजल्यास बाहेरच्या बाजूनें शिडी कायमची लावून ठेवलेली असते.

दिनमान—या देशाच्या बऱ्याच भागांत उन्हाळयांत रात्र अवघी २।४ तास असते कांहीं ठिकाणीं तर उन्हाळयांत दिवस २३ तासांचा व रात्र अवघी एक तासाची असते. तसेंच हिंवाळयांत रात्र २३ तासांची व दिवस अवघ्या एक तासाचा असतो. अर्थात् उन्हाळयांत सूर्य रात्रीं अकरा साडे अकरा वाजतां मावळतो व पहाटे एक वाजण्यापूर्वींच उगवतो. उलट, हिंवाळयांत सूर्य सकाळीं अकरा वाजल्यावर उगवतो व दोन प्रहरीं एक वाजण्यापूर्वीं मावळतो! काय मजा! उन्हाळयांत रात्रीं सूर्यप्रकाश म्हणजे दिवस व हिंवाळयांत दिवसां रात्र!

येथें उन्हाळा थोडे दिवस असतो. उन्हाळयाचे दिवस थोडे म्हणून सुगीचें सर्व काम लौकर आटोपावयाचें असतें. शिवाय उन्हाळयांत दिवस मोठे असल्यानें पुष्कळ वेळ काम करण्याची सोयही असते. म्हणून या दिवसांत लोक श्रम अतिशय करतात. मुलांना शेतीच्या कामीं मदत करतां यावी म्हणून उन्हाळयांत शाळा बंद ठेवतात.

कांहीं भागांत उन्हाळयांत एकदां सूर्योदय झाला म्हणजे दिवस एकसारखा दोन महिने असतो. या वेळीं सूर्य आकाशाभोंवतीं मळसूत्रासारखा फिरत राहातो. उलट, हिंवाळयांत सूर्य मावळला म्हणजे तो दोन महिने उगवत नाहीं, म्हणजे रात्र एकसारखी दोन महिने असते. असल्या मोठ्या रात्रींत कामकाजें दिव्यांच्याच उजेडांत

करावीं लागतात. आरोरा बोरिआलिस् नांवाचा एक प्रकारचा स्वाभाविक विजेचा प्रकाश या रात्रीं असतो, त्याचाही बराच उपयोग होतो.

लोक—नॉर्वे देश डोंगराळ व नापीक असल्यामुळें लोकांना उद्योगधंद्यासाठीं समुद्राचा आश्रय करावा लागला. यामुळें जहाजें बांधणें, व्यापार करणें, मासे मारणें या धंद्यांची या देशांत प्राचीनकाळींच वाढ झाली. परदेशांवर स्वाऱ्या करण्यासंबंधानेंही नॉर्वेंतील लोकांची ख्याति आहे. त्यांच्या स्वाऱ्या इंग्लंडादि देशांवर पूर्वीं अनेक वेळां झाल्या आहेत, एवढेंच नव्हे तर २ हजार मैल लांबीवर असलेल्या देशांपर्यंतही ह्या स्वाऱ्यांचे पल्ले लांबलेले होते. या देशाचा व्यापार फारच मोठा आहे. देशांतील बराच पैसा जहाजें व आगबोटी बांधण्यांत खर्च होतो. नॉर्वेंच्या व्यापारी जहाजांची संख्या बरीच मोठी आहे.

लोक फार हुशार खलाशी आहेत. लहान मुलांमुलींनाही समुद्र म्हणजे परसांतलें पाणी व होड्या चालवणें म्हणजे निव्वळ खेळ वाटतो. तीं वेळेनुसार मोठ्या खलाशाचेंही काम करूं शकतात.

---

# आफ्रिका.

कांहीं हिंदू लोक रामेश्वराच्या यात्रेला जातात हें तुम्हीं ऐकलें आहे. हें रामेश्वर नांवाचें क्षेत्र अथवा पवित्र ठिकाण जेथें आहे त्याच्या आसपासच्या देशांत लोकांच्या अंगांत कपडा फारकरून नसतो. बहुतेक लोक उघडे बोडके असतात. शाळेंत मुलें देखील उघडींच जातात. इकडील एक गृहस्थ तिकडे यात्रेला गेले होते. ते आग-

गाडींतून प्रवास करीत असतां त्यांच्या डब्यांत असलेला एक मनुष्य आपलें पैशाचें पाकीट त्यांच्याजवळ देऊं लागला. तसें करण्याचें कारण विचारतां तो म्हणाला 'तुमच्या अंगांत कपडा आहे त्याला खिसा आहे, त्यांत हें पाकीट तुम्हांला ठेवतां येईल. माझ्या अंगांत कपडा नाहीं म्हणून मला हें हातांत धरावें लागतें.' तेथें कचेरींत कामगार लोकही अंगांवर नुसतें उपरणें घेऊन जातात. कपडे कमी वापरण्याची चाल या देशांत कां आहे? याचा हवेशीं कांहीं संबंध आहे काय? होय. या देशांत बाराही महिने हवा उष्ण असते म्हणून अंगांत कपडे घालण्याची जरुरी वाटत नाहीं. असे दुसरेही कांहीं देश आहेत. त्यांपैकीं एकाविषयीं माहिती सांगतों. आफ्रिका नांवाचें एक खंड म्हणजे अनेक देश मिळून झालेला फार मोठा देश आहे. त्याच्या कांहीं भागांतील लोक बाराही महिने उघडे असतात. एक लंगोटी घातली कीं झाला त्यांचा पोशाक. एकाद्या समारंभास जाण्यासाठीं पोशाकाची जरुरी असेल, तर गळ्यांत एकादी कसलीतरी माळ घातली कीं झालें! मात्र आफ्रिका खंडांत सर्वच ठिकाणीं असें नाहीं. कांहीं भागांत स्थिति निराळी आहे.

लोक—या देशांतील लोक एकंदरीनें काळे आहेत. शिद्दी म्हणून जाड्या ओठाचे व काळेकुट्ट जे लोक आपण पाहातों ते याच देशांतले. कांहीं लोक इतके भयंकर दिसतात कीं, ते राक्षस आहेत का काय असें तुम्हांस वाटेल. तुम्हांस वाटतें तें कांहीं अंशीं बरोबरही आहे. कारण राक्षसांप्रमाणें त्यांपैकीं कांहीं लोक माणसांस मारून खातात.



माणसाचें मांस खाणारा शिद्दी.

कांहीं लोक युद्धप्रिय व रक्तपातप्रिय फार आहेत. यांच्यांतील एका राजानें आपल्या मुलास आपल्या अधिकाराचें चिन्ह म्हणून मारलेल्या माणसांच्या दांतांचा केलेला हार दिला.

शरीर सुशोभित करण्याचे कांहीं लोकांचे प्रकार मोठे विचित्र आहेत; ते येणेंप्रमाणें:—केसांस घड्या घालणें; केसांचें पट्टे काढणें; डोक्याच्या कांहीं भागांतील केस उपटून नाहींसे करणें; डोक्यावर केसांचे झुपके ठेवणें; दांत घांसून सपाट करणें, उपटून काढणें किंवा त्यांना काळा रंग देणें; कातडी डागणें किंवा तिला रंग देणें; गोंदणें; हातांत, पायांत, गळ्यांत लोखंडाचीं किंवा पितळेचीं कडीं घालणें; शिंगें, पिसें, शिंपले, दांत, हाडें यांचे दागिने घालणें इ०. कांही लोक वस्त्राच्या ऐवजीं साली ( वल्कलें ), गवत अथवा पाला यांचा उपयोग करतात.

# दक्षिण आफ्रिका.




आफ्रिकेंताल झूलू जातीचा मनुष्य.

काफिर—दक्षिणआफ्रिकेंतील लोकांपैकीं काफिर नांवाचे लोकांची तुम्हांस माहिती सांगतों. काफिर लोक फार शूर आहेत. त्यांच्यामध्यें अशी चाल आहे कीं, लढाई चालू असतां एकाद्या मनुष्याच्या पाठीवर जखम पाहिली तर ( तो मनुष्य भित्रा म्हणून ) त्यांच्या जातीचा मुख्य त्यास ठार मारण्याची शिक्षा देतो. लढणाऱ्या माणसाच्या अंगाच्या पुढील भागीं जखम व्हावयाची; पण जो भिऊन पळतो त्याच्या पाठीवर शत्रूचे घाव पडावयाचे; म्हणून ज्याच्या पाठीला जखम झाली तो शत्रूला भिऊन पळाला असें ते समजतात.

काफिरांचीं गांवें व घरें—गांवाची रचना पुढीलप्रमाणें

असते. झोपड्यां एकाशेजारीं एक, मध्यें चौकोन करून अथवा वर्तुलाकार, बांधलेल्या असतात. मध्यभागीं मोकळें पटांगण असतें. झोपड्याही वाटोळ्या असतात. झोंपडींत जाण्यास वाट असतें, पण दरवाजा नसतो. दार झांकण्यासाठीं काठ्यांची ताटी किंवा कातड्याचा एक पडदा असतो. झोपडीस इतर दारें किंवा खिडक्या मुळींच नसतात.



काफिरांचें गांव व वाटोळीं घरें.

मुलें---काफिर लोकांमध्यें मुलगी जन्मास आली तर आई-बापांस वाईट वाटत नाहीं. लग्न करणारा मनुष्य बायकोच्या बापास गाई देतो, म्हणून मुलींमुळें आईबापांस फायदा होतो.

या लोकांमध्यें मूल लौकर चालूं लागलें नाहीं तर त्यास मुंग्यांच्या वारुळाजवळ नेऊन ठेवतात. तेथें त्यास मुंग्या चावूं लागल्या म्हणजे तें बिचारें नाइलाजास्तव चालूं लागतें !

मुलांना लहानपणीं भाल्याचा उपयोग करण्यास व लढण्यास शिकवितात. हेंच त्यांचें मुख्य शिक्षण होय.




आफ्रिकेंतील झेब्रा नांवाचा प्राणी.

मुलांना शिक्षा करण्याची काफिरांची रीत मोठी चमत्कारिक आहे. एकादा मुलगा खोटें बोलला, तर त्याच्या हातांत एकादा कढत पदार्थ देऊन त्यास मूठ मिटण्यास सांगतात व 'मी खोटें बोललों' असें तो कबूल करीपर्यंत ती मूठ दाबून धरतात.

**चालीरीती वगैरे**—काफिरांतील पुरुषांचें काम गुरें राखणें, व बायकांचें काम शेती करणें समजलें जातें. काफिर लोकांची मुख्य संपत्ति गुरेंढोरें होत. कांहीं गुरें दिलीं कीं बायका मिळतात, व पुरुष आपल्याजवळील गुरांच्या संपत्तीच्या मानानें कमीजास्त बायका विकत घेतो. जी बायको विकत घेण्यास जास्त गुरें पडलीं असतील, ती कमी किंमतीच्या सवत बायकांपेक्षां आपणांस श्रेष्ठ समजते.

**काफिर लोकांच्या कांहीं समजुती**—विस्तवाकडे पाठ करूं नये, केल्यास माकडाचा जन्म येतो. घरांतून बाहेर पाणी फेंकूं नये. शीळ घालूं नये कारण शीळ घातली असतां घरांत साप येतो ( ही समजूत आपल्या इकडेही कांहीं लोकांत आहे ). झोपडींतून बाहेर पडतांना पाठीकडून—झोपडीकडे तोंड करून—बाहेर पडूं नये. कांहीं समजुतींचीं कारणें स्पष्ट दिसतात. तीं काय असावीं हें सांगा बरें ?

घोडा हा प्राणी काफिरांना पूर्वी मुळींच माहीत नव्हता म्हणून युरोपियनांनीं आणलेले घोडे पाहून त्यांना फार आश्चर्य वाटलें. आई मुलास कडेवर किंवा पाठीवर घेते त्याप्रमाणें घोडा गोऱ्या माणसास पाठीवर नेतो असें पाहून त्यांनीं घोड्यास ' गोऱ्या माणसाची आई ' अशा अर्थाचें नांव दिलें !




आफ्रिकेंतील पाणघोडा नांवाचा प्राणी.

**दक्षिण आफ्रिकेंतील कांहीं प्राणी**—काफिरांच्या देशांत मुंग्या फार आहेत. त्यांपैकीं शिपाईमुंग्या नांवाच्या मुंग्या फार भयंकर आहेत. त्या एकदां एका दिशेनें जाऊं लागल्या कीं, त्यांचा मोर्चा दुसरीकडे वळावयाचा नाहीं. वाटेंत जें कांहीं येईल त्याचा फन्ना उडवून पुढें जावयाचें असा त्यांचा निश्चय. त्यांच्या वाटेंत सिंहासारखे प्राणी आले तर तेदेखील मुंग्यांच्या चाऱ्यास भिऊन पळून जातात. एकाद्यास भयंकर शिक्षा द्यावयाची असली म्हणजे लोक त्या माणसास या मुंग्यांच्या वाटेवर नेऊन सोडतात.

कांहीं जातींच्या मुंग्या इतक्या पुष्कळ व भयंकर असतात कीं, त्यांच्या मार्गांत एकादा जखमी मनुष्य पडलेला आढळला, तर एका दिवसांत त्या माणसाचा फन्ना उडवितात.

या देशांत कांहीं विंचू व कोळी वीतभर लांब असतात. विंचू फार विषारीही असतात.

**सुसरी**—कांही नद्यांतून मोठमोठ्या सुसरी असतात. एका नदींत सुसरी फार असल्यामुळें तिला सुसर या अर्थाचेंच नांव ठेवलें आहे. कांहीं सुसरी एवढ्या मोठ्या असतात कीं, त्या पाणी पिण्यांस आलेल्या सिंहासही धरतात. असें सांगतात कीं, सुसरीची पाठ खडकाप्रमाणें खडबडीत असल्यामुळें ज्या (परक्या) मनुष्यास त्यांची माहिती नसते तो चुकून त्यांच्यावर खडक असें समजून पाय देतो, व पाय ठेवल्याबरोबर सुसर पाण्याकडे जाऊं लागली कीं तिच्याबरोबर तो पाण्यांत जातो !



सुसर.

**टोळ**—ह्या देशांत टोळांचा त्रास फार. टोळांचा एकेक कळप अर्धा मैल रुंद व दहा मैल लांब असतो.

**शहामृग**—काफिरांच्या देशांत शहामृग पक्षी फार आहेत. शहामृगाची उंची सात फुटांवर असते. त्यास पंख आहेत पण ते लहान असल्यामुळें त्यास उडतां येत नाहीं. तो पंख पसरून घोड्याहून जलद धावूं शकतो. वेगानें धांवतांना तो आपले पाय इतके जलद उचलतो कीं, धावतांना त्याचे पाय, गाडीच्या जलद फिरणाऱ्या चाकाच्या आऱ्यांप्रमाणें, दिसतदेखील नाहींत.

हा प्राणी जात्या गरीब आहे. तो माणसास फारकरून इजा करीत नाहीं, पण रागावला म्हणजे खूप जोरानें लाथ मारतो.

शहामृगाची किंमत त्याच्या पिसांमुळें आहे. एक तोळाभर पिसांना १०।१९ रुपये पडतात.



शहामृग.

येथें जमीन मुबलक असल्यामुळें शहामृग पक्षी बाळगण्याचा धंदा फार फायदेशीर होतो. त्यांना बाळगण्याचा खर्च फारच थोडा असतो. एका विस्तीर्ण पटांगणाभोंवतीं तारेचें कुंपण केलें कीं, झाला शहामृगांचा वाडा तयार. शहामृगांना चरावयास न्यावयाचें असतें, तेव्हां त्यांच्या गळ्यास वाद्या बांधतात व त्या वाद्या घोड्यावर बसलेला मनुष्य आपल्या हातांत धरून त्यांना वाटेल तिकडे नेतो.

शहामृग पाळण्याचा धंदा किफायतशीर असल्यामुळें देशाबाहेर परवानगीशिवाय शहामृग पाठविणारास दीड हजार व शहा-

मृगाचें अंडें पाठविणारास पाऊणशें रुपये दंडाची शिक्षा तेथील सरकारनें ठेविली आहे.

हिऱ्यांच्या खाणी—काफिरांच्या देशांत हिऱ्यांच्या प्रचंड खाणी आहेत. कांहीं हिऱ्यांच्या खाणी एवढ्या मोठ्या व इतक्या खोल आहेत कीं, एकादें खेडेगांव जमिनीच्या खालीं ३।४ शें फूट लपवून ठेवावयाचें असलें, तर त्या खाणींत सहज ठेवतां येईल !

या खाणींत सांपडणारे हिरे पांढऱ्या रंगाचे असतातच; पण कांहीं पिवळे, हिरवे, निळे, गुलाबी वगैरे अनेक रंगांचे असतात.

---


# अमेरिका.

आपण दिवसां काम करीत असतां झोप घेणारीं व आपण झोप घेत असतां काम करणारीं माणसें आहेत असें तुम्हीं ऐकलें आहे काय? 'हो' असें तुम्ही म्हणाल. हीं माणसें कोण? तर नाटकवाले, चोर, रेल्वेवरचे नोकर असें तुम्ही उत्तर द्याल. पण असा एकादा देश तुम्हांस माहीत आहे का कीं ज्यांतील सर्व लोक, आपण रात्रीं निजलों असतां त्याच वेळीं, दिवसां ढवळ्या अथवा सूर्यप्रकाशांत काम करीत असतात? असे लोक हे अमेरिका नांवाच्या खंडांतील होत.

तांबडे इंडियन—या खंडांतले मूळचे लोक तांबडे इंडियन नांवाचे आहेत. ते आपल्या इकडील भिल्ल, कोळी वगैरे लोकांप्रमाणें रानटी आहेत. ते बहुधा झोपड्यांतून राहातात.

झोपड्या बायका बांधतात. त्या जमिनीमध्यें लांब वासे वर्तुळाकार पुरतात व त्यांचीं वरील शेवटें एका ठिकाणीं मिळवून तीं बांधून टाकतात. या वाशांना भोंवतालीं बर्च नांवाच्या झाडाच्या सालींनीं

आच्छादितात; कीं झाली झोपडी ! झोपडीच्या वरच्या अंगास हवेसाठीं थोडी जागा मोकळी सोडलेली असते. तिच्या खालीं जमिनीवर थोडी वाळू पसरलेली असते, व या वाळूंत चूल करतात. चुलीचा धूर वर असलेल्या भोंकांतून जातो.



तांबड्या इंडियनांची झोपडी.

मुलें रानांतून लव्हाळे व बोरू तोडून आणतात. त्यांची आई कांहीं मुळ्या ठेचून तयार केलेला रंग त्यांना देते. तो रंग या

लव्हाळ्यांस देऊन त्यांच्या ते चटया करतात. बसण्यास आणि निजण्यास या चटयांचा उपयोग होतो. लव्हाळ्यांच्या ते सुंदर टोपल्याही विणतात.

इंडियनांचे कान व डोळे फार तीक्ष्ण असतात. रानांतील रस्ता शोधून काढण्यांत, तसेंच पाठलाग केलेलें जनावर ( हरिण, अस्वल वगैरे ) कोणत्या रस्त्यानें गेलें असेल हें हुडकून काढण्यांत ते फारच पटाईत असतात.

चालीरीती—इंडियन लोकांत बायको विकत घ्यावी लागते. एकाहून जास्त बायका करण्याची चाल त्यांच्यामध्यें आहे, व बायको विकत घेण्याची चाल असल्यामुळें श्रीमंत लोक अनेक बायका करूं शकतात. म्हणून एकाद्या माणसाच्या श्रीमंतीचा दर्जा त्याच्या बायकांच्या संख्येवरून ठरवितात.

कांहीं जातींमध्यें तारुण्य प्राप्त झाल्यावर मुलास जातीचा मुख्य किंवा त्याचा आजा सडकून मार देतो. नंतर एक वर्षभर त्या मुलास खाण्यापिण्याचे नियम पाळावे लागतात. छाती, दंड, हनवटी या ठिकाणीं त्याचे आंग कापतात व त्या कापलेल्या भागीं कांहीं वनस्पतींचा रस चोळतात. शेवटीं त्याच्या सर्व अंगाला मुंगळे डसवितात. त्यानें तो इतका विव्हल होतो कीं, तो आठ दिवस निजून राहातो. हें सर्व होतांना त्यानें गपचिप बसलें पाहिजें. जर तो रडला, ओरडला किंवा आपणास यातना होत आहेत असें त्यानें दाखविलें, तर त्यास फिरून मुंगळे डसवितात!

कांहीं जातींमध्यें मुंगळे डसविण्याचा विधि झाल्यावर त्या तरुणाला दोऱ्यांच्या जाळीच्या केलेल्या एका झोपाळ्यावर निजवि-

तात व तेथें त्याला बांधून टाकतात, आणि खालीं जमिनीवर विस्तव पेटवून धूर करतात. ह्या झोपाळ्यावर त्याला एक किंवा दोन आठवडे पडून राहावें लागतें. तेथें असतांना त्याला आरारूटची भाकरी व भाजलेले मासे एवढेंच खावयास देतात.

ह्या विधींचा उद्देश मुलांना शूर व कंटक करणें हा असावा.

**अमेरिकन लोक**—ह्या अमेरिका खंडांतील कांहीं भागांत इंग्लिशांनीं वस्ती केलेली आहे. त्यापैकीं एका भागाचें नांव युनायटेड स्टेट्स् ऑफ् अमेरिका असें आहे. यासच आपले लोक थोडक्यांत ' अमेरिका ' असें म्हणतात व ह्यांतील लोकांस अमेरिकन म्हणतात. हे अमेरिकन लोक फारच उद्योगी आहेत. ते सकाळपासून संध्याकाळपर्यंत धावपळ करीत कामें करीत असतात. कांहीं लोकांना दिवसां स्वस्थपणें जेवण्यासही फुरसत मिळत नाहीं !

ह्या देशांतील विशेष गोष्ट ही कीं, ह्या देशांत राजा प्रजा, सरदार व साधे लोक, काळे गोरे असा लोकांमध्यें भेद नाहीं. सर्व लोक सारख्या दर्जाचे समजले जातात. ह्या देशावर राजा नाहीं. जो मनुष्य देशावरील मुख्य अधिकाऱ्याचें काम करण्यास लायक असेल त्यास लोक निवडतात व तो देशांतील राज्यव्यवस्था पाहातो. दर चार वर्षांनीं त्याच्या जागीं दुसरा मनुष्य निवडतात.


येथें आगगाडीच्या डब्यांमध्येंही पहिला, दुसरा, तिसरा असे भिन्न वर्ग नाहींत. सर्व लोक मूळचे सारख्या दर्जाचे ही कल्पना येथें लोकांच्या मनांत इतकी बिंबून गेली आहे कीं, रेल्वेवरील एकादा कंडक्टर अथवा तिकिट कलेक्टरच काय पण हमालदेखील

आगगाडींतील फराळाच्या डब्यांत वाटेल तेवढ्या मोठ्या गृहस्था-शेजारीं खुर्चीवर बसून त्याच टेबलावर खाना खातो. यांत आपण दुसऱ्याचा अपमान करतो हें त्यांच्या मनांतही येत नाहीं. आग-गाडींतही हे लोक येऊन वाटेल त्याच्या शेजारीं बसतात. खाणा-वळीमध्यें एकादा कर्नल (=सैन्यावरील मोठा अधिकारी) आला तरीही तेथील द्वारपाल किंवा मुख्य वाढपी बरोबरीच्या नात्यानें त्याच्याशीं शेकहँड करतो.

अमेरिकन लोक उद्योगधंद्याच्या कामांत फार महत्त्वा-कांक्षी आहेत. महत्त्व म्हणजे मोठेपणा; त्याची आकांक्षा म्हणजे इच्छा ज्यांना असते त्यांना महत्त्वाकांक्षी म्हणतात. प्रचंड दुकानें व कारखाने काढून कोट्यवधि रुपये मिळविणें ही त्यांची महत्त्वा-कांक्षा असते.

न्यूयॉर्क शहर—हें या देशांतील एक प्रचंड शहर आहे. तें मुंबईच्या पांचपट मोठें आहे; म्हणजे या एका शहरांतच सहा जिल्ह्यांतील लोकवस्तीएवढी लोकवस्ती आहे. या शहरांइतके कार-खाने लंडन शहरावांचून दुसऱ्या कोठेंही नाहींत.

या शहरांतील कांहीं गोष्टी फार विलक्षण आहेत. एथल्या इतकी महागाई दुसऱ्या कोणत्याही शहरीं नाहीं श्रीमंती हाटेलां-तून म्हणजे खाणावळींतून एक दिवस राहण्याजेवण्याबद्दल पंन्नास रुपये द्यावे लागतात. येथल्याइतक्या उंच इमारतीही जगांत कोठें नाहींत. येथें दहावीस मजल्यांच्या इमारती अनेक आहेत; पण एक इमारत ५६ मजल्यांची आहे! ती वूलवर्थ नांवाच्या गृहस्थांनीं बांधली आहे. 'कुइबी चीज उठाव दो दो आना' (म्हणजे कोणतीही



छप्पन्नमजली वूलवर्थ हवेली.

वस्तू घ्या किंमत दोन आणे) अशा प्रकारचीं हातगाड्यावर फिरतीं दुकानें इकडे शहरांतून कधीं कधीं दृष्टीस पडतात; असलीं पण बैठीं, ज्यांतील कोणत्याही वस्तूची किंमत दहा सेंट ( सुमारे ६ आणे ) आहे, अशीं दुकानें काढून त्यांवर वूलवर्थ या गृहस्थानें कोट्यवधि रुपये मिळविले व त्या पैशानें ही इमारत बांधली. या इमारतींत वरच्या मजल्यांवर जाण्यास चोवीस विजेचे पाळणे आहेत !

या शहरांत जमिनीवरून जाणाऱ्या आगगाड्या आहेतच; पण माडीवरून अथवा दुमजली रस्त्यावरून जाणाऱ्या आगगाड्याही आहेत; म्हणजे रस्त्यावर रूळ टाकण्यास जागा नाहीं म्हणून रस्त्यांत लोखंडी खांब पुरून व त्यांवर तुळया घालून त्यांवरून आगगाडीचा रस्ता नेला आहे !

येथें रोज निघणारीं वर्तमानपत्रें फारच मोठीं असतात. न्यूयॉर्क हेरल्ड नांवाचें वर्तमानपत्र ९२ पानांचें असतें !

न्यूयॉर्क बंदराचे तोंडाशीं स्वतंत्रता देवीचा धातूचा पुतळा आहे. त्याची पायथ्यापासून उंची ५९ पुरुष आहे. या पुतळ्याचे एका उभ्या बोटांत एक मनुष्य सहज उभा राहूं शकतो.

पंडिता रमाबाई यांनीं केलेलें **हिंवाळ्याचें वर्णन**—"ज्यानें या देशांत जाऊन उत्तर प्रदेशांतराहून हिंवाळ्याचा प्रभाव पाहिला नाहीं त्याला इकडे थंडीची कल्पनासुद्धां करतां येणार नाहीं. हिंवाळ्यांत नद्या, झरे, तळीं एकंदर थिजून त्यांतील पाणी दगडासारखें घट्ट होतें.

"जानेवारी आणि फेब्रुआरी ह्या दोन महिन्यांत रस्त्यावरून चालण्याची मोठी पंचाईत पडते. ज्याला ह्या गोष्टीची माहिती नाहीं, असें एखादें मनुष्य घरांतून बाहेर पडतांना, रस्त्याचे बाजूच्या पायवाटा किती चकचकीत आणि स्वच्छ आहेत, म्हणून मनांत आनंद मानीत एक दोन पावलें पुढें टाकतें आहे तोंच एकाएकीं घसरून स्वारी खालीं येते. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी झोंपेंतून जागी होऊन पाहातें तों माझ्या खोलीच्या खिडक्यांचीं भिंगें विलक्षणच दिसत होतीं. त्यांवर कांहीं पांढरवट पदार्थांचा जाड लेप लागलेला असून त्या लेपांत कोणी अति सुंदर वेलबुटीदार चित्रविचित्र नक्षी काढली असल्यासारखें दिसून आलें. हा चमत्कार काय आहे म्हणून मी पुढें जाऊन पाहातें तों रस्ता, घरांचीं छतें, खिडक्या, दारें वगैरे चांदण्यापेक्षा पांढऱ्या स्वच्छ तुषारांनीं आच्छादित झालेलीं दिसून आलीं व काल जें न्यूयॉर्क माझ्या दृष्टीस पडलें होतें तें आज अगदीं बदलून गेलें; हीं दोन शहरें एकच आहेत हें सहसा खरें वाटलें नाहीं. थंडी तर काय मी म्हणत होती. नळांतलें पाणी थिजून जाण्याच्या बेतात आलें

होतें. सकाळीं न्याहारीच्या वेळीं स्वैंपाकणीनें मला रोजच्याप्रमाणें प्यायला पेलाभर दूध आणून दिलें, तें तोंडांत घेऊन गिळण्यापूर्वीं खडीसाखरेच्या खड्याप्रमाणें चावून खावें लागलें! थंडीमुळें विस्तवाची उष्णता देखील नाहींशीं झाल्यासारखी झाली.

**आकाशांतून बर्फ पडतें त्याचें वर्णनः**—"तुषार पडतांना शब्द मुळींच होत नाहीं. कोणी उभे राहून बारीक सपीठ चाळीत असतां तें जसें हलकेंच जमिनीवर पडतें, व तें खालीं पडल्याचा शब्द कोणाला ऐकूं येत नाहीं, त्याप्रमाणेंच तुषारही कोणाला नकळतच पडतो. त्याचे कण आकाशांतून खाली येतात, तेव्हां ते पांढऱ्या जाईच्या फुलांच्या नाजूक पाकळ्यासारखें नाचत, बागडत, रडत, पडत, गोंधळत, मोठ्या घाईनें धावत येत असलेल्या अणुरेणू एवढाल्या आनंदी पऱ्यांप्रमाणें सुरेख दिसतात. काळ्या किंवा काळसर रंगाच्या कापडावर कांहीं तुषारकण धरून पाहिले असतां त्यांच्या आकृति बहुत सुंदर व विचित्र असलेल्या दिसून येतात. अशा त्या पांढऱ्या फटफटीत तुषारानें आच्छादून गेलेली जमीन, झाडेंझुडपें, मैदानें, रस्ते व घरांचीं छतें किती सुरेख आणि चमत्कारिक दिसतात, हें ज्यानें पाहिलें नाहीं त्याला सांगून कळावयाचें नाहीं.

"हा तुषार जरी इतका पांढरा सुंदर आणि अतिशय लाजाळू स्त्रीप्रमाणें कांहीं गडबड किंवा शब्द केल्यावांचून लोकांस नकळत पृथ्वीवर येतो, तरी ह्याचा पराक्रम केवढा भयंकर आहे तो ज्यानें पाहिला आहे त्याला त्याचा कधीं विसर पडणार नाहीं. त्यांनीं न्यूयॉर्क शहरांत आणि त्याच्या आसपास महाप्रलय करून सोडला. त्यांनीं रस्त्यांत जिकडे तिकडे पडून वाळवंटांतील वालुकापर्वतासारखे ढीग करून टाकले. यांनीं अग्नी, वरुण, अशनि (वीज), वायु इत्या-

दिकांकडून चाकरी करवून घेणाऱ्या अमेरिकन माणसांची बुद्धि गुंग करून टाकली. आगगाड्यांचे ते महावेगशाली अग्निमय घोडे रस्त्यावर खुंटविले. रस्त्यांत जाणाऱ्या येणाऱ्या माणसांवर आणि घोड्यांबैलांवर पडून त्यांस खालीं दडपून गुदमरून मारलें. आगगाड्यांचा आणि पुलांचा विध्वंस केला. आणखी किती काय केलें याचा सुमारच करवत नाहीं !

" पश्चिमेस आणि उत्तरेस उष्णतामापक यंत्रांतील पारा शून्या-खालीं साठ अंशांपर्यंत उतरतो आणि बर्फाचे ढीग पंचवीस तीस फुटांइतके उंच असतात. अशा उत्पाताच्या वेळीं कोठें आश्रय घेण्यास जागा नसल्यामुळें पश्चिमेस उघड्या मैदानांत असलेलीं कोट्यवधि गुरें भयंकर थंडीच्या तावडींत सांपडून मरून जातात. गेल्या आणि त्याच्या मागल्या वर्षीं ऐंशी लक्षांवर गुरें अशा प्रकारें थंडींत कुडकुडून मरण पावलीं. त्या गरीब प्राण्यांना ज्या ज्या यातना सोसाव्या लागल्या असतील त्यांचें नुसतें अनुमान केलें तरी आंगावर शहारे उठतात. ह्यांशिवाय दरवर्षीं तिकडे किती हजारों मनुष्यें व इतर पशुपक्षी थंडीनें मरत असतील, हें कोणाच्यानें सांगवणार नाहीं. "*

---

## न्यू झीलंड.

आपण येथें थंडीनें कुडकुडतों तेव्हां जेथें लोक उकाड्यानें हुश् हुश् करीत असतात व आपण येथें उकाड्यानें हुश् हुश् करतों तेव्हां जेथील लोक थंडीनें काकडतात असा एकादा देश पृथ्वींत

* पंडिता रमाबाई यांच्या 'युनायटेड स्टेट्सचें प्रवासवृत्त' या पुस्तकांतून.

असेल काय? आहे. असा एक नाहीं अनेक देश आहेत. यांपैकीं एक देश न्यू झीलंड नांवाचा आहे. तसाच दुसरा पूर्वीं सांगितलेला दक्षिण आफ्रिका, हा होय. न्यू झीलंड देश हल्लीं इंग्लिशांच्या ताब्यांत आहे. यांतील राहाणारे मूळचे लोक माओरी नांवाचे आहेत.

हा देश आपल्या देशाहून पुष्कळ बाबतींत फार निराळा आहे. त्या ह्या कीं, ज्यांतून खडकांचा जळजळीत लाल रस बाहेर पडतो असे पर्वत, व ज्यांचें पाणी कढत आहे असे झरे या देशांत फार आहेत. अशा झऱ्यांस उन्हाळीं म्हणतात. ह्या उन्हाळ्यांमुळें येथील लोकांची एक फार मोठी सोय झाली आहे. ती ही कीं, त्यांच्या साहाय्यानें चूल पेटविल्यावांचून बायकांना सैंपाक करतां येतो. मासे, भाजी वगैरे पदार्थ टोपलींत घालून ती बायका उन्हाळ्यांत नेऊन ठेवतात, कीं ते पदार्थ शिजून निघतात. कधीं कधीं ही टोपली जमिनींतून निघणाऱ्या वाफेच्या फवाऱ्यावर ठेवली; म्हणजे तेंच काम होतें.

उन्हाळें किंवा वाफेचा फवारा नसला म्हणजे लोक जमिनींत खळगा खणून त्यांत जवळच आढळणारे तापलेले धोंडे टाकतात व त्यांवर पानांत गुंडाळलेलें कच्चें अन्न ठेवतात. जरूर असल्यास त्यावर थोडें पाणी ओततात, व वर माती घालून भोंक बंद करतात. थोड्या वेळानें वरची माती उकरून काढतात, तों खालीं अन्न शिजून तयार झालेलें आढळतें.

---

## ग्रीनलंड.

ह्या देशाइतका आपल्यादेशाहून निराळा देश जगात दुसरा

क्वचित् सांपडेल. जें बर्फ आपल्याकडे एखाद्या वेळेस दृष्टीस पडतें त्यानें हा देश वर्षांतील बहुतेक महिने पूर्णपणें आच्छादिलेला असतो. जिकडे पाहावें तिकडे बर्फ. कांहीं ठिकाणीं तर जमिनीवर बर्फाचा थर शेंकडों फूट जाड असतो. उघडच, ह्या जमिनीस सूर्य-प्रकाश कसा तो माहीत नसला पाहिजे.

**हवामान**—या देशांत थंडी कांहीं विलक्षणच. इतकी थंडी दुसऱ्या कोणत्याही देशांत नसते. चहासारखा पातळ पदार्थ चुलीवरून उतरून थोडा वेळ बाजूला ठेवला तर थंडीनें गोठून त्याचा बर्फ होतो. एवढेंच नव्हे, तर रात्रीं आपल्या श्वासाबरोबर जी वाफ बाहेर पडते तिचें बर्फ होऊन त्याचा थर छातीवरील कपड्यावर सांचतो. अर्थात् जागे होऊन पाहावें तों छातीवर बर्फाचा थर दिसतो. थंडीनें भाकरी दगडाप्रमाणें कठीण होते. मांस इतकें कठीण होतें कीं, तें करवतीनें कापावें लागतें !

थंडीनें आंगावर भाजल्यासारखे फोड येऊन आंग चिघळतें, तेव्हां फारच हाल होतात. अशा वेळीं एखाद्या धातूच्या पदार्थास—लोखंडवगैरेस—हात लावला, तर तो पदार्थ जणू काय त्यास सरस लावला आहे असा हातास घट्ट चिकटतो. पाणी आणण्यास वगैरे घराबाहेर पडलें असतां थंडीनें आंग काकडून, कोणी काठीनें बड-विल्याप्रमाणें, दुखूं लागतें.

एका प्रवाशानें केलेलें हवेचें वर्णन पाहा:—

“ दिवसांही धुराड्यांतून चुलीवर बर्फ, न वितळतां, पडतें ! धुराड्याच्या तोंडावर तर बर्फाची कमान झाली आहे. ”

थंडीनें दगडही उकलतात. जहाजांच्या फळ्या थंडीनें आकस-तात तेव्हां त्यांचे जोड किंवा सांधे, पिस्तूल उडविल्यासारखा फाड्दिशी आवाज होऊन, फाटतात !

या देशाच्या कांहीं भागांत एक दिवस चार महिन्यांचा तर एक रात्र ४ महिन्यांची असते. चार महिन्यांची रात्र येते तेव्हां अंधाराचा माणसांना तर कंटाळा येतोच, पण कुत्रीं देखील वेडीं होऊन जातात.


**वनस्पति**—अतिशय थंडीमुळें ह्या प्रदेशांत वनस्पति फारच थोड्या उगवतात. मोठीं झाडें तर कोठेंच होत नाहींत.

**लोक**—ह्या देशांत राहाणाऱ्या लोकांना एस्किमो म्हणतात ह्यांचीं घरें फार विलक्षण असतात.



एस्किमो व त्याचा कुत्रा.


**घरें व वस्ती**—घरें सामान्यतः खड्डयांत बांधलेलीं असतात. ( ऊब जास्त यावी हें त्याचें कारण असावें ). घरांच्या भिंती दगड व मातीचीं ढेकळें यांच्या केलेल्या असतात. वर आडवीं लाकडें टाकून त्यांवर माती घालून छप्पर केलेलें असतें.



एस्किमोंचीं घरें व घसरत्या गाड्या.

झोपडींत शिरण्यासाठीं लांब बोगद्यासारखें दार ठेवलेलें असतें. त्यांतून पालीप्रमाणें सरपटत जावें लागतें. झोपड्यांना धुराडें किंवा खिडक्या नसतात. हवा येण्यास झोपडीला वरच्या बाजूस एक लहानसें भोंक ठेवलेलें असतें. जाळण्यास लाकडें नसून एक मोठी दगडी पणती असते, व तिच्यांत चरबीचा दिवा असतो. तोच एस्किमोंचें उजेड व उष्णता यांचें साधन होय. धोंडे व माती मिळण्याची अडचण पडते, तेव्हां एस्किमो बर्फाच्या शिळांचीं घरें बांधतात.

ह्या देशांत गांवें फार थोडीं. तीं फार लहान व एकमेकांपासून दूर असतात. या दशांतील फार मोठें गांव इकडील एका खेड्याएवढें असतें. बरींच घरें एकमेकांपासून फार दूर असतात. ह्या देशांत शेतें नाहींतच; पण दुकानें बहुतेक नाहींत व रस्तेही नाहींत. बर्फावरून वाटेल त्या वाटेनें ज्यानें त्यानें जावें.




एस्किमोंचीं घरें.

पोशाक—एस्किमोंचे कपडे सीलच्या कातड्यांचे केलेले असतात. पुरुषांच्या व बायकांच्या पोशाकांत फारसें अंतर नसतें. फक्त बायकांच्या कुडत्यास मागल्या बाजूस पिशवीसारखा मोठा खिसा असतो, त्यांत त्या तान्हीं मुलें ठेवतात !



एस्किमो स्त्री व तिच्या पाठीवरील मूल.

घरांत अंगावर कपडे बहुतेक नसतात. बाहेर थंडी अतिशय असली तरी त्यांच्या झोपड्यांना खिडक्या किंवा दारें फारशीं नसल्याकारणानें आंत ऊब बरीच असते. म्हणून, व कपडे लौकर फाटूं नयेत म्हणून झोपडींत शिरल्यावर लोक बहुतेक कपडे काढून ठेवतात; फार तर एखादा आखूड मांडचोळणा घालतात.



**एस्किमोंच्या तंबूचा आंतील भाग.**

**अन्न**—मांस व सीलची चरबी हें एस्किमोंचें मुख्य अन्न होय. त्यांना भात किंवा भाकरी माहीत नाहीं. भाजीचें नांवही घ्यावयास नको. ते चरबी फार खातात. अतिशय थंड हवेमुळें हें अन्न त्यांना मानवतें. थंडीच्या दिवसांत अंगांत उष्णता यावी म्हणून धुंदुर्मासाच्या अथवा धनुर्मासाच्या दिवशीं पुष्कळ तूप खाण्याची चाल आपल्याकडे आहे, त्याप्रमाणें त्यांच्यामध्यें नित्य तूप खाण्याची चाल आहे; मात्र

त्यांचें तूप म्हणजे चरबी हेंच होय. म्हणून एस्किमोंचा नित्य धुंदुमास असतो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ह्या देशांत चरबीचें महत्त्व किती आहे हें एका प्रवाशाच्या पुढील वर्णनावरून कळून येईल.

" माणशीं दर आठवड्यास पावशेर लोणी आम्ही घेत असूं. लोणी शिल्लक असेपर्यंत त्याचे गोळेच्या गोळे खाणें ही एक आमची मोठी चैनीची बाब असे. एकदां का लोण्याच्या डब्याचें झाकण उघडलें, कीं फिरून झाकण घालणें मोठें जिवावर येई. क्रिश्चिॲनसेनची तर या बाबतींत फारच त्रेधा उडे. तो पाहिल्याच दिवशीं आपल्या वांटणीचें पावशेर लोणी मट्ट करून टाकी ! स्निग्धान्न खाण्याची ....ची इच्छा इतकी अनावर होई कीं, एके दिवशीं त्यानें मला विचारलें कीं, ' बुटाला लावावयाचें तेल ( हें जुनें आळशीचें तेल होतें ) खाल्लें तर चालेल कीं नाहीं !"

ह्या देशांत अन्न मिळणें फार कठीण. म्हणून अन्न मिळेल तेव्हां तें सडकून खाण्याची संवय इकडील लोकांना लागलेली आहे. एक एस्किमो एका वेळीं पक्के ३॥ शेर मांस सहज खातो !

**चालीरीती**—आप्तस्नेही भेटले म्हणजे नमस्काराऐवजीं नाक नाकावर घासण्याची त्यांची चाल असे, पण ती आतां नाहींशी झाली आहे. एस्किमो लेकांचें आदरातिथ्य अरबांच्या आदरातिथ्याप्रमाणें अमर्याद असतें. तंबूंत आलेल्या कट्टया शत्रूचेंही ते स्वागत करतात आणि महिनेच्या महिने त्याला जेवावयास घालतात ! जास्त अन्न नसलें, तर एस्किमो आपलें जेवण पाहुण्यास देऊन आपण उपाशीही राहातो!

**खेळ, करमणुकीचे प्रकार इ०**—धावण्याच्या व भाला फेकण्याच्या शर्यती, तिरंदाजी, उड्या मारणें, जड धोंडा उचलणें, हे त्यांचे

आवडते मर्दानी खेळ होत. घोंगड्यांत मनुष्य बसवून व तें माणसांनीं धरून त्यांतील मनुष्य उंच उडविणें व त्यास परत झेलणें हाही एक मोठा आवडता खेळ आहे.

त्यांना तपकीर ओढण्याचें व्यसन आहे. तपकीर शिंगासारख्या नळींत ठेवलेली असते. मित्र जेव्हां एकमेकांपासून जाऊं लागतात तेव्हां तपकीर देण्याघेण्याचा मोठा विधि होतो. प्रत्येकजण तपकीरीचें शिंग काढून तें इतरांस देतो व प्रत्येक इसम शिंगाचें टोंक नाकांत खुपसून तपकिरीचा झुरका घेतो. एकेक शिंग प्रत्येकाकडे निदान दोनदां येतें. ह्या विधीच्या शेवटीं प्रत्येकाचें नाक तपकिरीनें बहुधा भरून जात असावें!


हिंदूंच्या कांहीं जातींतील चालीप्रमाणें मेलेल्या माणसाबद्दल इतर माणसांनीं मोठमोठ्यानें रडण्याची चाल एस्किमोंत आहे. मेलेल्या माणसाबद्दल त्याच्या जवळच्या नातेवाइकानें रडण्यास प्रारंभ केला कीं, बाकीचे सर्व लोक मोठ्यानें रडतात. जमलेल्या मंडळींतील सर्वांत मोठा जो कोणी मनुष्य असेल त्यानें मुख्य शोक करणाऱ्याचे डोळे पुसावयाचे अशीही चाल आहे. या रडण्यासाठीं मंडळी आमंत्रणानें जमतात; पण कधीं कधीं असें होतें कीं, एक मनुष्य रडण्यास लागला म्हणजे बाकीचीं जमलेलीं माणसें कारण न विचारतां रडूं लागतात !

**उद्योग**—सील, वालरस, देवमासे, अस्वलें, खोकडें यांची शिकार करणें हा त्यांचा मुख्य उद्योग होय. ह्यावरच ते निर्वाह करतात.

समुद्रावर तरंगणाऱ्या बर्फाचे खडकावर उभे राहून ते कधीं कधीं सीलची शिकार करतात. एकाद्या वेळीं हा बर्फाचा ताफा वाहात वाहात किनाऱ्यापासून फार दूर जातो, व तो लवकर किना-

त्याजवळ आला नाहीं तर त्यावरील लोक थंडी व उपासमार यांमुळें मृत्युमुखीं पडतात.

ग्रीनलंडांतील एक विलक्षण गोष्ट म्हणजे बिनचाकाच्या गाड्या. या गाड्यांस कुत्रे जोडतात. हे कुत्रे क्रूर व भांडखोर असतात. ते प्रेतें खातातच, पण पोटभर खावयास मिळालें नाहीं तर कधीं कधीं बायकांमुलांवर व क्वचित् पुरुषांवर हल्ला करून त्यांनाही मारून खातात.



कुत्रे जोडलेली घसरती गाडी.

एस्किमोंना कुत्र्यांचा उपयोग फार आहे खरा; पण त्यांची कामधेनु सील सोय. ते सीलच्या कातड्याचे कपडे व बूट करतात. होड्या व ढोल त्याच कातड्यांनीं मढवितात; व सीलच्या आंतड्यापासून केलेल्या तंतूंच्या दोऱ्या करतात. मासे मारण्यासाठीं केलेले भाले पाण्यांत तरंगावे म्हणून त्यांना जे कातड्याचे फुगे लावलेले असतात तेही सीलच्या कातड्याचे केलेले असतात. सीलचें मांस व चरबी खाण्यास व चरबी दिव्यांत जाळण्यास उपयोगीं पडते. मासे धरण्यासाठीं सीलच्या हाडाचे गळही करितां येतात.

मुलें—एस्किमोंच्या मुलांचे मुख्य खेळ गाड्या व चाबूक हे होत. तीं

बर्फाची शिळा घेतात व तिला वाद्या बांधून तिची गाडी करतात. या गाडीला तीं कधीं कधीं कुत्र्यांचीं पिलें जुंपतात.



**एस्किमो मूल.**

बर्फावरून व समुद्रांतून फिरून प्राण्यांची पारध करणें हा एस्किमोंचा मुख्य धंदा असल्यामुळें मुलांना हीच गोष्ट मुख्यतः शिकवितात व हा मोठ्या मुलांचा एक खेळ असतो.

लहान मुलांचा दुसरा एक आवडता खेळ टेकडीवरून गडगडत येणें हा होय. यासाठीं कांहीं मुलें एका लहानशा टेकडीच्या माथ्यावर जातात. तेथें तीं उकीडवीं बसून आपलीं डोकीं पायांच्या दरम्यान घालतात व हातांनीं घोट्याभोंवतीं मिठी मारून शरीराचा चेंडू बनवितात. मग शरीराला थोडा झटका देतात, कीं तो शरीराचा चेंडू एकाद्या खऱ्या चेंडूप्रमाणें टेकडीवरून गडगडत येतो ! कातड्यांत वाळू भरून त्याचा चेंडू करतात व त्यानेंही कांहीं मुलें खेळतात.

# उपसंहार.

मुलांनो, ह्या वेळपर्यंत ज्या निरनिराळ्या देशांविषयीं तुम्हांला माहिती झाली, त्यांसारखे आणखी बरेच देश आहेत. हे सर्व प्रदेश मिळून पृथ्वी होते.

तुम्हांस निरनिराळ्या लोकांविषयीं जी माहिती झाली आहे, तिजवरून कळून आलें आहे कीं, निरनिराळ्या देशांत चालीरीती व राहाणी हीं निरनिराळीं असतात. त्या निरनिराळ्या लोकांमध्यें चालीरीतींच्या बाबतींत चांगले लोक कोणते ? ' अर्थात्, आपण हिंदुस्तानांतील लोक ' असें तुमच्यापैकीं पुष्कळांकडून उत्तर येईल. पण बालमित्रांनो, विचार करा कीं, तुम्हांस आपल्या चालीरीती जशा चांगल्या वाटतात, तशा त्या त्या इतर लोकांनाही त्यांच्या चालीरीती वाटत नसतील काय ? आपल्या बायकांची लुगडें नेसण्याची तऱ्हा आपणांस चांगली वाटते व मद्रासी किंवा गुजराथी बायकांची लुगडे नेसण्याची तऱ्हा आपणांस चमत्कारिक वाटते; पण मद्रासी किंवा गुजराथी बायकांना यासंबंधानें काय वाटतें ? त्यांना वाटतें त्यांची तऱ्हा चांगली व आपली म्हणजे दक्षिणी बायकांची लुगडें नेसण्याची तऱ्हा वाईट. असेंच पुष्कळ बाबतींत आहे. कांदे खाणाऱ्या लोकांना कांद्याचा वास आवडतो पण तो न खाणाऱ्यांला कांद्याची घाण येते. रस्त्यानें बोडकें चालणें हें आपणांकडे गैर समजतात, पण हिंदुस्तानांतील बंगाल नांवाच्या देशांत रस्त्यानें बोडकें हिंडणें मुळींच गैर समजत नाहींत. इंग्लिश लोकांत तर एकाद्याच्या घरीं गेल्यावर किंवा रस्त्यांत गांठ पडली असतां टोपी काढणें हा दुसऱ्याचा मोठा मान राखणें असें सम-

जतात. याप्रमाणें भिन्न लोकांत भिन्न चाली असतात. ह्या चाली पडण्यास कांहीं कारणें असतात; उदाहरणार्थ, एस्किमो लोक नेहमीं मांस खातात, याचें कारण त्यांना मांसाशिवाय दुसरें कांहीं मिळण्यासारखेंच नसतें. तसेंच ते स्नान करीत नाहींत, याचें कारण तेथें पाण्याची अडचण व विलक्षण थंडी. यास्तव दुसऱ्याची चाल भिन्न आहे म्हणून त्याला हलके किंवा वाईट समजणें योग्य नाहीं.

भिन्न देशांच्या माहितीवरून दुसरी ही गोष्ट कळून येते कीं, जगांतील भिन्न लोक आपले बंधु आहेत. ‘ जे उपयोगीं पडतात ते बंधु ’ असा बंधु शब्दाचा अर्थ आहे, व जगांतील निरनिराळे लोक आपणांस लागणारे निरानिराळे जिन्नस पुरवितात, म्हणून ते आपले बंधु आहेत. ब्रह्मदेशांतील स्वस्त तांदूळ आपणांस मिळणार नाहीं तर गरीब लोकांचे, विशेषतः दुष्काळांत, किती हाल होतील ? चीनमधील फटाके इकडे आले नाहींत, तर दिवाळींतील कितीतरी मजा कमी होईल ? जपानी पंखे व खेळणीं न येतील, तर तुमची किती गैरसोय होईल ?

आपल्या देशापासूनही इतर देशांस निरनिराळे उपयोगी पदार्थ मिळतात. याप्रमाणें जगांतील लोक एकमेकांच्या उपयोगीं पडतात म्हणून ते एकमेकांचे बंधु होत.

तसेंच, एकाच आईबापापासून झालेले भिन्न लोक एकमेकांचे भाऊबंद असतात, त्याप्रमाणें एका परमेश्वरापासून जगांतील भिन्न लोक झाले आहेत, म्हणून ते सर्व एकमेकांचे भाऊबंद होत.

ह्या भाऊबंदांनीं एकमेकांशीं न भांडतां एकमेकांवर प्रेम करावें हें त्यांचें कर्तव्य आहे.

२११८

समाप्त.

REFBK-0002189
REFBK-0002189